संग्रहालय क्रमांक
३०६९
पुस्तकाचें नांव
म. ग्रं. सं. ठाणें
नाटक
क्र. ६७५

22

# रावणवध

# नाटक

# RAVAN VADHA NATAKA

# रावणवध नाटक.

हें नवीन पुस्तक

रावजी बाळकृष्ण लेले यांनीं तयार करून.

**नारो आपाजी गोडबोले यांस बक्षिस**

दिलें.

तें त्यांनीं

पुणें पेठ सदाशीव येथें आपले "वृत्तप्रसारक"

छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केलें.

---

**आवृत्ती दुसरी.**

---

या ग्रंथावर न सन् १८४७ चा आक्ट २० व १८६७ चा २५

प्रमाणें सर्व प्रकारें ग्रंथ स्वामित्वाचा हक्क नारो आपाजी-

गोडबोले यांनीं आपले कडे-

ठेविला आहे.

किंमत ०८ आणे.

# प्रस्तावना

श्री शंकर पदभक्त जो श्रीधरनामाख्य प्रसिद्ध स. कविवर्य त्यानें शिवलीलामृत, रुक्मिणीस्वयंवर, हरिविजय, रामविजय, इत्याद्यनेक ग्रंथ परम रसाळ असे ओंवी बद्ध केले आहेत; त्यापैकीं रामविजय ग्रंथांतील ३३वा व ३४वा अध्याय आधार धरून मी हें "रावणवध" नांवाचें नवीन नाटक जन मन रंजन सेवाप्राप्त्यर्थ केलें आहे. यांत शृंगार, वीर, करुणा इत्यादीक रस यथा शक्ती साधण्याचा प्रयत्न कसा केला आहे हें पूर्ण ग्रंथ अवलोकन केला असतां सूज्ञ वाचकांचे लक्षांत येईल.

प्रस्तुत ग्रंथ कर्त्यास असावी तशी कविताशक्ती नाहीं; परंतु ती श्रीजगदंब कृपेनें यत्नांतीं भक्तिभावानुसारें वृद्धिंगत होईल अशी पूर्ण आशा आहे.

सूज्ञ जनांनीं दोषांकडे दृष्टी न देतां गुणांश गृहण करावा, अशी त्यांस आदर पूर्वक प्रार्थना आहे.

या ग्रंथांतील कवितेंत आलेल्या कठिण शब्दांवर अंक घालून त्यांचा अर्थ पृष्ठाचे खालीं टिपेंत स्पष्ट केला आहे.

ग्रंथकर्ता.

स्कूल मास्तर वांभोरी ता० राहूरी.

॥ श्री ॥

# रावणवध नाटक.

प्रकृत ग्रंथ कर्त्यानें मंगलाचरण

## आर्या.

॥ श्रीसांबनंदनानें, आनंदें वंदनार्थ जोडि करां॥
॥ त्याच्या पदांनु कंपें, कामादिक षंडरिबाधनी नरां १॥

## साकी.

॥ श्रीगजदाशा पूर्ण परेशा संकट हरणा येई ॥
॥ वीर दशानन कंदना वर्णन करिन असा वर देई ॥१॥

## श्लोक.

॥ श्री शारदे भगवती तव पादपद्मा ॥ वंदूनि मी स्तविनसे
॥ दिनरात्रि पद्मा ॥ दीनास देउनि मती कविता रसाला ॥ हा
॥ नीलमल्कारि अशा मज देवराला ॥ ३॥

॥ श्रीरामा, रविवंश भूषण विभो, गाजानकी जीवना ॥ कौसल्यात्मज रा-
॥ घवा, स्मरपते सर्वोत्तमा, सन्मना ॥ वारेकीं भवताप शांतिकरितां, त्वत्पादकं-
॥ दूनियां ॥ कीर्त्ती गावितुझी रसाळ कवनी, पावोपरी तीजया ॥ ४ ॥

(सूत्रधार प्रवेश करितो)

सूत्रधार- "करद्वय जोडून" हे रसज्ञ सभाजन हो, जगद्वंद्य जो भक्तवत्सल भगवान् अयोध्याधीश श्रीराम यानें, त्याची स्त्री जी जगन्माता सीता तिनें महत्पराक्रमी लंकाधीश रावणानें कापट्यें करून चोरून नेलें; म्हणून त्याशीं अघोर युद्धप्रसंग करून त्यास या विनाशी मृन्मय देहांतून मुक्त केलें, तो लीला प्रकार अत्युत्तम रमणीय असून विशेषतः पारमार्थिक ज्ञान दर्शक ही आहे; तस्मात तो सर्वांनी कृपा करून एकाग्र चित्तें अवलोकावा (इतक्यांत)

---

१ पुत्र. २ चरण कृपेनें. ३ सहा वैरी ४ मुहास. ५ लक्ष्मी.

विदुषक:- (रंगीं येऊन) हे भागवंता आतां तूं जो रसाळ खेळ करणार त्याचें नांव तरीं काय?

सूत्रधार:- अहाहा ही व्यक्ति आली काय ॥ नमोनमः यावें, मारिषा मी दशमुखी रावणवध या नांवांचें नाटक करणार आहें जानर सत्वर पात्रांची तयारी कर.

विदुषक:- (पत्रावळ मांडून) हूं वाढा पाहूं कशी "दशमी खिरीवाणी" लागते नीं ॥ यास काय नाटक म्हणावें काय? भलतेंच वेडें, वाहवारे बहादरा नाटककारा, तूं तरी आपला खुप चैनी रामच दिसतोस.

सूत्रधार:- वारे वः काय तरी सुलाने कान ॥ सांगावें एक तर ऐकतो दोन आणि करतो भलतेंच, अरे भल्या गृहस्था विदुषका, नीट ऐक "रावणवध नाटक" करावयाचें आहे, समजलास कीं, कां सुष्टिमोदकाची तयारी करूं

विदुषक:- हूं हूं सूत्रधार बुवा, अशा मोदकाचें मला पथ्य आहे, करितां मला ते नकोत तुमचे तुम्हींच खा, अहो आलीकडे या हिरोबाच्या कानोबावर बहिरोबाची स्वारी फार प्रसन्न आहे म्हणूनच असें अक्षरतें ऐकूं येऊन कधीं कधीं अर्थाचा अनर्थ सहज होतो, पण रागाऊं नकां हो, असो भावी कृत्यांत अशीं संकटें प्राप्त नव्हावीं, म्हणून तुम्ही अष्ट सिद्धी नायक जो गणपती त्याची भक्तिपुरःसर प्रार्थना करा.

सूत्रधार:- वहाव्वा ॥ मुलगा तर दाणा खराच; परंतु मस्कत त्यानें जें सांगितलें तें मान्य करणें श्लाघ्य होय. (गणपतीचें स्तवन करितो.)

## साकी

निजजनजनका गुणेगणगणेणा निगमागमा अभंगा ॥
त्वांनें कामनासिद्ध करुनि द्या अभयप्रद पदसंगा ॥५॥
वक्रीं बुज नव चुंबुनि शंभू भुललासुरसा बोला ॥
निर्गुण असतां सगुण होउनी दाविशि भक्तां लीला ॥६॥

आर्या:- दिनमणि भौंपरि तव तनु ॥ नीतें वर्णूं शकेन मी सत्य ॥

१ आपले २. समुदाय ३ गणाध्यक्ष ४ वेदालाही अज्ञात ५ मन कामना ६ मुख कमल ७ गोड ८ निराकार ९. साकार १० सूर्य. ११ कांति.

कुंक्षींमेरूघेउनि ॥ करिलकशी नी पिंपीलिका नृत्य ॥ ७॥ ५॥

श्लोक.

रातोंत्पलासमवपू[4] सकुमार फार ॥ केलाभभोर[6] जणुओंवुनि
कंठिहार॥ आरक्तसाजतउटी करिअंकुशानें ॥ निर्मूलऔ-
धिअटवी[8]स्वपराक्रमानें ॥ ८॥ ५॥

गणपती:- हे नाटकाचार्या तूं परम रसाळ अशा सुस्वर गायनें करून किम-
र्थ माझें स्तवन करितोस? हें कथन कर.

सूत्रधार:- (वंदन करून) रणरंगधीर श्रीरामानें दशवदनासीं रण युद्ध
केलें, तो लीलाप्रकार या रंगभूमीवर जनमन रंजन सेवार्थ करावयाचें यो
जिलें आहे; आपल्या वर प्रसादें करून हें कार्य निर्विघ्न सिद्धिप्रत पावावें.

गणपती:- वत्सा तुझी ही मनकामना सिद्धीस जाईल; परंतु नाटकपात्रां
करवीं प्रसंगानुरूप वाग्विलास यथा तथ्य व्हावा, म्हणून त्वां श्री शारदेची
स्तुती करावी. आतां मी स्वस्थानाप्रत गमन करतों.

सूत्रधार:- (सरस्वतीचें स्तवन करितो.)

श्लोक.

नवपदास विशारद[9] शारदा[10] ॥ नमितसें वरदानभलें सदां
सदय होउनि देई मला स्वतां ॥ सतत हें किं असो मनि नित्र ना९
जलें जना भरूता तुं सरस्वती ॥ करिशि सत्य मुक्यांस बृह-
स्पती[11] ॥ नर असे नयनांध मुढ्यांजरी ॥ नव कृपा करि त्या-
सहि जोहरी[13] ॥ १०॥

श्लोक.

॥ विवेका[14] हंसाच्यावरि अचल तें आसून निकें[15] ॥
॥ तुझें, साजे त्यातें स्मरण करितां हा भव[16] चुके ॥
॥ शरीरातें द्यावी जरि हि उपमा कांचनन[17]री ॥ दिसे
॥ नी वैगुण्[18]या नव पद रुपासाच वितरी[19] ॥ ११ ॥

१ कारखेंन २ पर्वतविशेष. ३ मुंगी ४ रक्त.वर्णीकमळ ५ शरीर ६ समुदाय ७ पीडा ८ अरण्य
९ ज्ञाती १० सरस्वती ११ ब्रम्हदेव १२ कन्या १३ रत्नपारखी १४ विचार रूप हंसाच्या १५ चांगलें
१६ संसार १७ सोनें १८ कमीपण १९ शारदी.

# रावणवध नाटक.

## आर्या.

हे विधिनंदिनि संतत ॥ कविहृत्कासारिं नूं असे १भ्रमरी
नव पद शरणागत मी ॥ येऊं दे गे कृपोब्धिचीलहरी ॥१२

## श्लोक.

औदास्य त्यागूं रसनाग्रभागीं ॥ दासास ठेवी परमानुरागी ॥
पाठीशिं राही समयीं तु जागी ॥ चित्तीं अणी नीतव पादयोगीं ॥१३

सरस्वती:- अरे हे भारता, परम सुस्वर गायनें करून किमर्थ माझी स्तुती करितोस तें सत्वर सांग.

सूत्रधार:- ( अभिवंदन करून ) हे माते श्रीशारदे, या दासानें या रमणीय स्थानीं दशवदन कदन नामधेय नाटकास आरंभ केला आहे तर मज सहवर्तमान सर्व नाटक पात्रांस रसास्वाद प्रासंगिक संभाषण करतां येईल असा आपला वरप्रसाद असावा.

सरस्वती:- हे सूत्रधारा, मी प्रमोदितांत करणें करून त्वदीच्छा परिपूर्ण करीन वत्सा त्वां उत्कंठित कार्यास सत्वर आरंभ करावा, आतां मी जगदुत्पालक जो मत्पिता त्याच्या मंदिराप्रत गमन करितें ( जाते )

## प्रवेश १ ला.

स्थल

सुवेलाचल पर्वत

पात्रें.

श्रीराम .................................... सीतापती.
बिभीषण .................................... ( रामभक्त रावणानुज
रावण .................................... लंकापती.
मंदोदरी .................................... रावणाची पट्टराणी.
शर्मा .................................... बिभीषणाची कांता.
नलनीलादि कपिगण .................................... रामाची वानर सेना.
शुक, सारण .................................... रावणाचा प्रधान.

१ भ्रमर कुमारी २ हृदयकमलीं ३ करुणासमुद्राची ४ वसतीस्थान ५ जिव्हाग्रभागीं ६ परमप्रीतीनें



**बिभीषण**– ( वंदन करून ) हे भक्त काम कल्पद्रुमा श्री रामचंद्रा दासाची विनंती श्रवण करावी.

साकी.

लंकानाथें हवन मांडिलें गुप्तरूपें विवरांत
पूर्णस्यंदन निघल पडतां पूर्णाहुत अग्नींत ॥ १४ ॥

आहुतीचे परिमळ सुटले आहेत नभमंडळ धूम्रानें पिंगटून गेलें आहे आणि अग्नीतून सबळसा दिव्य रथ अर्धा बाहेर निघाला आहे. यास्तव तेथून पूर्णाहुतीच्या पूर्वींच रावण उठला म्हणजे बरें. कारण त्या पासून भावी कल्यास अपाय होणार आहे असें मला वाटतें.

**राम**– अरे परम भक्ता, बिभीषणा तूं जें कथन केलेंस तें सर्व खरें आहे परंतु.

---

१ रावणानें २ यज्ञ ३ रथ ४ पूर्णाहुती.

नल- हे असुरदमना नवमेघःशामा, रामा, मानसानें ठायीं किमपी चिंता करूंनये मी दश सहस्र वानरगणासह वर्तमान गरुडवेगवत् आकाशपथें लंकेंत जाऊन त्या दुष्ट रावणाच्या यज्ञाचा विध्वंस करून येतों वंदन करूनक-पिगण लंकेंत जातात आणि असें करतात.

चामर वृत्त.

शोधिती दशाननास ते कपी घरोघरीं ॥
सावकाश राक्षसांस ताडिती परोपरी ॥
बोलती तयांस कीं दशास्य दाखवा चला ॥
दाविखूण गुप्त त्यांस ती बिभीषणाबला ॥१५॥

गंधमादन- अरे जांबुवंता, पहा त्या नगर दुर्गाखालीं प्रचंड गुहेच्याद्वारीं महान विशाल शीला ठेवून आंत तो दुराचारी महा कपटी रावण बसला आहे-सें दिसते तर चला आपण तेथें जाऊं (सर्व वानर जातात.)

द्वारपालक राक्षस- अरे मर्कटांनों काय गडबड मांडिली आहे? आल्या वाटेनें सत्वर परत जा नाहीं पेक्षां निरर्थक प्राणास मुकाल.

वानर- अरे दुष्टांनों उगीच वल्गाना करूनका आपल्या जिवास भिऊन पलायन करा (ते आंगावर चाल करितात असें पाहून) हों तर मग तुमचे आयुष्याची दोरी तुटली असें खचीत समजा (असें करतात.)

साकी.

पळन लागतां सर्वहि दधिले दुष्ट असे कर्बूर
शिळेस फोडुनि आंत शिरला पराक्रमी कपिभार ॥१६

(आंत पहातात तों असें दिसतें) श्लोक.

सांबाळया देखनि ते प्रचंड ॥ त्याच्यापुढें प्रज्वल होमकुंड
मांडीयलें आहुति टाकि त्यांत ॥ लंकापती चित्त करोनि शांत ॥१७

चामर वृत्त.

॥ रक्तमद्यमांस ढीग पर्वतापरी जियें ॥

१ रावणास २ वानर ३ त्या राक्षसांस ४ रावण ५ बिभीषणाची बायको ६ राक्षस ७ शिवालयास ८ पेटलेलें.

दीसती असंख्य त्या समीप बैसला निथें ॥
वज्रआसनास घालुनी तयावरी महा ॥
दुष्टरावणाख्य जास आसती शिरें दहा ॥१८॥

महा ही नरांचीं अगणित शिरें येथें पडलीं आहेत आणि हा रक्तपाधीश महा गुंड दशमुंड प्रचंड होमकुंड प्रज्वलित करून थंड बसला आहे ? तर आतां आपण वितंड मांडून हीं यज्ञपात्रें विखंड करून असें करूं कीं;

### श्लोक.

फोडून टाकूं मख भाजनें हीं ॥ घालूं बहू मांस मुखांत दाहीं
पाषाण फेकूं हवनालयांत ॥ ऐशी करूं येथ विचित्र मात ॥१९

अरे अशी धुमाळचकी केली असतां ही रावण जागृत होत नाहीं काय?
( चमत्कार करूं लागतात. )

### श्लोक.

कोणीं नाचति मस्तकीं दणदणा केंसां बहू ओढिती
कोणी कर्ण धरोनि लात बुकिनीं वक्षस्थळा ताडिती ॥
कोणी लघ्वि करी धुळीस उधळी त्याच्या शरीरावरी
ऐसा तो कपिमार त्यास थकि परी जागा न झाला तरी ॥२०॥

काय सांगावें या धटिंगणाला तर कोणत्याही गोष्टीची ग्रम्मच नाहीं हा अगडबंब बंब्या कोणत्या व्यतिपातावर जन्मला कोण जाणें !!! अहो, हीयाला काळनिद्रा तर लागली नाहींना; अरे हा आपल्यातर एक घमंडी नाथच दिसतो ( इतक्यांत )

जांबुवंत- हे नल नीलादीक हो, मित्र हो थांबा मला एक बरीच युक्ती सुचली आहे तेणें करून हें भक्कम् माप कांहीं उलथें पालथें झालें तर होईल. ( मग- असें करतात. )

### साकी.

दशवक्त्रांगा चरिती मयजा लोटियली अनिवार
तिची कंचुकी अलंकार ही सर्वचि केले चूर ॥२१॥

---

१ वळकट बैठक. २ यज्ञ. ३ भांडीं. ४ यज्ञकुंडांत. ५ रावणाच्या आंगावर. ६ मंदोदरी. ७ चोळी.

मंदोदरी-(उच्च स्वरानें) अहो प्राणनाथ, तुमच्या ह्या अघोर अनुष्ठानास आग लागो, पहा मला ह्या मेल्या करंट्या दुष्ट मांकडांनीं नग्न करून माझी कशी विटंबना मांडली आहे? तुम्हांस या अपकीर्तीची लाज वाटूं नये काय? जळलें हें मेलें ध्यान॥ बाई माझा सर्वस्वी अपमान झाला तरी आमच्या यरचांचें अजून ध्यानच होत आहे. अहो पहा या यज्ञ पात्रांची आणि होम कुंडाची काय दुर्दशा झाली आहे ती? (फार मोठ्यानें) (प्राणपती, प्राणपती, डोळे उघडा डोळे उघडा, (असें म्हणतांच रावण रावजी मोठ्या क्रोधानें उठतात.)

रावण-(चोहींकडे पाहून) अरे दुष्ट मर्कटांनो, ओं यज्ञ विध्वंस केलानका? हँ, बरें, तर मी तुम्हांस एका थापडी सरसें मक्षिके प्रमाणें चिरडून टाकतों.

श्लोक.

॥ तैंनीलही स्फगल अंगद मुष्टि घातें ॥
॥ झोडीपदीं इतर आपदि वानरांतें ॥
॥ शार्दूल[2] देखुनि जसे मृग[3] भार जाती ॥
॥ वेगें पळोनि तसले कपि धांवताती॥२२॥

वानरगण-(सत्वर रामाकडे येऊन वंदन करून म्हणतात)

ओंवी

॥आतां उठला रावण ॥ क्रोधें युद्धार्थ दारुण॥
॥ चमू[4] घेवूनि निर्वाण॥ येत सत्वर जाणपा॥२३॥

राम-(वीर मुद्रेनें) शाबास शाबास तुमच्या सारखे पराक्रमी वीर कपिगण मला साह्य असतां कोणतीच चिंता करणे नलगे (कोदंड उचलून) पहा तो दुष्ट वंचक सन्मुख येतांच राम बाणानें सामर्थ्य काय तें त्यास दाखवितों. अरे आतां त्या मयासूर कन्यकेचें समग्र सौभाग्य नष्टच पावलेंच असें समजा. (एकडे.)

रावण-आलिंगन देऊन) अंगप्रियसखे आतां ही रत्न कनकादियुक्त भूषणें व बहु मोला दिल्यावरें सत्वर परिधान करून स्वस्थानाप्रत गमन कर. अगे

१ बुकीनें २ सिंह ३ हरिणादि. ४ सैन्य ५ अतिशयीत.

प्रियतमे, मारूत भोग कधीं चुकत नाहीं; तस्मात् किंचितही कष्टी होऊंनको, आजमीं त्या अनिवार्य शत्रूंचीं शिरें छेदीत तरच राहीन; नाहीं पेक्षां तुमची आमची ही शेवटची भेट असें पक्कें समज

मंदोदरी- (सचिंत मुद्रेनें) अहो प्राणनाथ जो परात्पर भगवान् साक्षात् पूर्णपरब्रम्ह श्रीराम त्याशीं आपण निरर्थक द्रोह केल्यामुळें आप्तहानी, यश हानी, द्रव्य हानी इत्यादि अनेक विपत्ती प्राप्त झाल्या तथापी आपला दुष्ट हट्ट न सोडितां पुनरपि युद्धाप्रत जावयाची तयारी करीत अहां परंतु याची पुढें मला थडगती दिसत नाहीं. हें चिन्ह सर्व प्रकारें धुळीस मिळण्याचें दिसतें, अहो, एतद्विषयीं बिभीषण भाउजीनी ही पूर्वीं बहुत प्रकारें आपल्यास यथा योग्य विनंती केली; परंतु महाराजांनीं तिकडे लक्ष दिलेंच नाहीं "देव देतो आणि कर्म नेतें" हें वाक्य खरेंच आहे, पहा शिव प्रसादें करून आपल्याला ही अतुल संतती व संपत्ती प्राप्त झाली; आणि तिचा उपभोग चौदा चौकड्या युगें आपण घेत असून तिचा परिणाम गोड व्हावा काय? अहो जागृत असून निद्रावस्थेचें सोंग घ्याल तर त्यास मी काय उपाय करूं बरें? खरेंच बाई, मला मेलें आतां कांहींच सूचत नाहीं. आग बाई, हितमहित ज्ञान असून जर आपला हेका व वेडेपणा कोणी सोडणार नाहीं तर तेथें आम्ही बायकांनीं काय करावें? कोणी ऐकिलें तर बाई सांगण्याचा उपयोग नाहीतर मेलें दिसतेंच आहे; पहा, पहा; त्या भक्तवत्सल भगवंताशीं अनिर्वाच्य हाडवैर करून त्यास जरी अनुपमेय पीडा दिली आहे तथापि अद्याप त्याच्याल्या भवभय नाशक चरणकमला प्रत शरण गेलें तर तो सर्व साक्षी व सर्व समदृष्टी त्रिजगदाधिपती श्रीराम ह्या विनाशी विस्तीर्ण भवांबुधींत मज्जित होऊ देणार नाहीं असें वाटतें, सारांश स्वामींनीं दूरदृष्टी देऊन अद्यापतरीं आपलें स्वात्महित करून घ्यावें (हात जोडिते)

रावण- (रोषानें) अगे व्यर्थब्रम्हज्ञान बकूं नको, तातू आजास शिकविते काय? मला कांहींच कां कळत नसेल? असो आतां विलंब करून उपयोग नाहीं तूं आपली येथून लवकर जा, चल तीघ.

मंदोदरी- अहो एक तरी करा कीं,

रावण- कां उगीच पिर पिर लाडली आहेस? जा, जा, लोकर, मी त्रिजगीं अ-

पले नांव राहील असेंच कृत्य करीन, समजलीस, तुजसारिख्या चतुर स्त्रीनें अशा महत्कृत्यास अडवें येणें अश्लाघ्य होय, (निरुपाय जाणून ती जाते.)

रावण:- (सभेंत येऊन) अरे हे प्रधान श्रेष्ठा, शूरहस्ती, आतां सत्वर सेनेची तयारी करावी. त्या दुष्ट मानव शत्रूंनीं मला अतोनात त्रास दिल्या मुळें माझ्या तळची आग मस्तकांत शिरली आहे (पायआदळून) परंतु मद्भुज पराक्रम त्यांस माहीत नाहीं कींकाय? बरेंतर तें सौख्य त्यांस दाखविलेंच पाहिजे.

शूरहस्ती:- (सेनेची तयारी करून) राजाधिराज महाराज, मीं आपल्या आज्ञेनुरूप सर्व सेनेची कडीकोट तयारी केली आहे, ती अवलोकन करावी.

श्लोक.

भेरीदुंदुभिज्या[1] भयंकर अशा, कर्णे तुतारे तसे
धोंधोंधाडि धडाडि वाजनि बहू सेना कशी ती दिसे
अंकीं पायदळांस येत गणितां नाहींच हो मोजितां
वाजी[2] वारणें[3] सादि[4] संध सरसे चौताकतीं पाहतां॥२४॥

लंकापती नानाप्रकारचे दिव्यरथ घेतले आहेत, पुढें बंदीजन गर्जनाकरीत आहेत आतां विलंब न करतां चलावयाचेंच असेल तर या महान दिव्यस्यंदनावर आरोहण करावें.

रावण:- (राजचिन्हासहित रथारूढ होत्सातां बिभीषणास उद्देशून म्हणतो) अरे मी तर राक्षसकुल संप्रदायानुसारच करणार, तुला कितुत्याला असें विपरीत केल्यानें काय राज्यपद प्राप्त होणार आहे करतर तूंच राज्य कर.

साकी-

घडघडघड घड सत्वरतेंरथजातो मनांत येई॥
रावण वर जणुं मुक्तिनोवरी पर्णायारणिजाई॥२५॥

प्रवेश २रा.


स्थल

१ वाद्यविशेष २ अश्व ३ हत्ती. ४ घोडेस्वार.

## रणभूमी

### पात्रें

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीराम | दशरथनंदन. | रावण | लंकाधीश. |
| बिभीषण | रावणानुज. | मंदोदरी | रावणाचीस्त्री. |
| हनुमानादि कपिगण | राम सेना | इंद्र. | देवांचाराजा. |
| बृहस्पती | वाचस्पती देवगुरू | मातली | इंद्राचा सारथी. |



वानर:- ( ससैन्य रावण रणांगणी येतांच ) अरे दुष्टा, राक्षसकुलाधमा, क्रूरहृदया, अद्याप तुझी घमंड मोडली नाहींकाय? युद्धाची धमक दाखविनोस काय? अरे पहा हें तुझें सैन्य आमच्यावर चालून येत आहे परंतु सावध रहा.

### आर्या.

कपिनगपादप[1]देती झाकुनित्यायातु[2]च्यावरी घोर

---

१ वृक्ष. २ राक्षसांवर.

झालेतेणेंजर्जर : लागे त्यांच्या जिवास हा घोर ॥२६॥

रावण- अरे अशा चेष्टेनें काय व्हावयाचें आहे? एका क्षणार्धांत तुमचा चुराडाउडवीन गरुडापुढें सर्पाचा पराक्रम चालेल काय? तर अवलोकन करा.

## आर्या.

दशशारिं चूर्ण करुनि नग[1] लंकापति तो वदे महाशूर
देखुनि मद्भुजविक्रम घेउनि असफैकपिसमस्त जा दूर ॥२७

(असें ऐकतांच रामचंद्र पुढें सरसाऊन) अरे तस्करा, शतमूर्खा तूं निरर्थक आपला कुलक्षय करून घेत आहेस. संतती, संपत्ती व विद्या, धन याचा तुला यथासांग उपभोग घेतां येत नाहीं, अद्याप तरीं हें अज्ञानत्व सोड, आतां हा डोळ्यावरचा धूर जाऊं दे नाहींपेक्षां तव माण हरतें माझे शर सोसावयास समरंगणी सिद्ध हो.

रावण- (रोषानें) अरे मानवाच्या कार्ट्या, श्रवण कर.

## आर्या.

जरि पामरा तुला रे वदती कीं रामचंद्र लोकांत
तरि मी राहु दशानन ग्रासिन आजी समग्र समरांत ॥२८
समरीं स्फुटतां मत्शर मेरु मांदार होतिरे चूर्ण ॥
तूं सकुमार कसें तें सोसिशि याचा विवेक करि पूर्ण ॥२९
पश्चिम दिशेस जाणकिं जरि हीतो उदय पावला तरणी
प्राप्त न होईल तरि ती सीता सुंदर तुला नवी तरणी ॥३०

कदाचित् मुंगी आपल्या मस्तकीं धरणी धारण करील. सिंव्ह जंबुकास भिऊन गज मस्तकींचीं मौक्तिकें त्यास देईल. मक्षिकेच्या पक्षवातें करून मेरूपर्वत उडून जाईल अशी ही विपरीत गोष्ट कालगतीनें एकवार होऊं शकेल; परंतु ती सुंदर व सकुमार सीता सती कितीही केलें तरीं तुला पुनरपि प्राप्त होणार नाहीं. पहा.

---

१ पर्वत. २ पराक्रम. ३ प्राण. ४ राहुनामक ग्रह. ५ युद्धांत. ६ माझे बाण. ७ पर्वत विशेष ८ सूर्य. ९ तरुण वयस्क.

आर्या.

गीळिलपतंग अनला येईलसर्पास शरणहीगरुड॥
परितुजमिळेनसीता तीच्यासाठींसदांअसाचिरड॥ ३१

राम:- (संतप्त होऊन) अरे कां उगीच वल्गना करतोस? जसें चंडवातें प्रचंड वृक्ष भंग होत्साते धरणीवर धाडकन् धाडकन् आपटतात, तसें तुझें हें अवजड शरीर मी एका तीव्रबाणेंकरून याभूतलावर लोळवीन. हों सावध रहा, हा शर सुटला पहा; (चाप टणत्कार होतो)

श्लोक.

सोडीयलातेंशरकालदंड झालाटणत्कारमहाप्रचंड
मांडीयलेंघोररणींवितंड दुष्टासिहोतोचिउदंडदंड॥ ३२

विदुषक:- (सकंप होऊन) अरे सूत्रधारा, नकोबाबा हें नाटक अरे हें काय? घन चक्र मांडिलें आहे काय? या उभयतां राम रावणांच्या भोंवया धनुष्याकार चढून गेल्या आहेत, नेत्र आरक्त झाले आहेत; बाहू स्फुरण पावताहेत परस्परांवर मेघवत् तीव्रबाणवृष्टी चालली आहे, रण वाद्यांच्या अघोर नादानें हें समरंगण दणदणून गेलें आहे, धरणी तर थरथरां कांपतच आहे! असें वाटतें, उभयतांच्या हस्तांतील सतेज मुद्रिका जणुविद्युत् चापल्या वत् चम् चम् करून राहिल्याआहेत, आणि हा आगड बंब धुनाड्या आपली भयंकर बत्तिशी बाहेर काढून व अक्राळविक्राळ ओबड धोबड थोबाड पसरून जांभाडांतून कुवा, क्वा इत्यादिक शब्द मेघ गर्जनेचें परी करीत आहे. मी सकंप झालों आहें कांहीं पूर्व संचित पदरीं असेल तरच खचित वांचेन, नाहींतर आपली अस्मानी सुलतानीं बनलीच आहे. या प्रसंगीं त्या गबाळ भरजीनें हींमला धैर्य देण्याची अबाळ मांडलीसें, दिसतें, असो काकच तसा आहे.

सूत्रधार:- मोठे बाजीराव बेटे॥ धैर्य सोडावयास काय शूत्र पशू मागें लागले आहेत काय? क्षणभर छाती मोठी करून मौज तर पहा म्हणजे सर्व होसफिटेल. आतांच कोण कोणाची मोडशी जिरविती किंवा अठरामासे चांदी बनाव-

१ दीपक ज्योतीला.

तो हें समजून येईल. अरे एकीकडे हा हें पहा काय अरिष्ट आलें आहे तें १(
कीकडे होतो.)

रावण-(भुजंगास्त्राचा प्रयोग करून) ऑं अरे दुष्टा, मानवा, आतां हे काळसर्प
तुझा व तुझ्या वानर सेनेचा क्षणार्धांत नाश करतील.

आर्या.

कपिकटकावर येती वेगें समुदाय दुष्ट सर्पांचे ॥
दंशिती त्या कडकडुनी मानिति भय सर्वही विरवाराचें ३३

राम- अरे राक्षसाधमा, निर्लज्ज शिरोमणे यांनरे काय केलेंस ? (गरुडास्त्र
सोडितो.) साकी

व्योम घराला आणि ऊर्विला येती जे फोडून ॥
सुपर्ण अगणित सकलों सर्पों भक्षिति बहु कोपून ३४

रावण- दुष्टा हा काल पर्यंत मी तुझी हयगय केली; परंतु पहा. पहा, पहा, आ-
तां हें सर्व जाळून भस्म करतो (जातवेदास्त्र सोडितो.)

राम- यांत तर कांहींच अर्थ नाहीं, तुला युद्धाची रीती काय माहीत? अभक्ष
भक्षण करावें आणि मृतप्राय निजून रहावें हेंच तुझें काम; परंतु अव लो-
कन कर (मेघास्त्र सोडितो)

रावण- अरे मर्कट मित्रा, तुझी विशाद काय !! मलातर मानव म्हणजे
केवळ कस्पटा समान भासत आहे. पहा.

आर्या.

सोडी प्रभंजनास्त्रा कोंडी अद्रीसें आड घालून ॥
वारा राम ससैन्यचि होईल मानी मनी अतीं दून ॥ ३५

राम- अरे दुष्टा तूं आपली दुष्ट बुद्धी खेळवेल तितकी खळवितोस; परंतू
नीचा, वाळूची भिंत किती टिकणार आहे? (वज्रास्त्र सोडितांच सर्व पर्वत
चूर्ण होतात.)

रावण- अरे पोरट्या, तूं युद्ध सामर्थ्याची फारच घमेंड बाळगून असशी

---

१सैन्यावर. २ आकाशाला ३ पृथ्वीला. ४ गरुड. ५ वातास्त्र. ६ पर्वत. ७ दुर्बळ.

ल मी आपली उगीच इतकावेळ घोर चेष्टेची मौज पाहिली, पण आतां तु-
झी उपेक्षा करीत नाहीं. (बाण मारतो.)

सार्की.

दिनकर मुखसा सायक सोडी जाचें तेजअपार
तो रामाच्या वामे पदाला लागुनि गेलादूर॥ ३६

(असें दृष्टीस पडतांच वानरगण क्रोधायमान होतात.)

वानरगण- (भुःकार टाकून) अरेअरे चांडाळा हें वेरंगर, तुझ्या व
तुझ्या सेनेच्या स्त्रिया रंडक्या केल्या वांचून आम्ही रहातच नाहीं अघोर यु-
द्ध सुरू झालें, त्या कालीं असें भासलें कीं,

जसा ज्ञानरूप सूर्य अज्ञान तमानें समूळ नाहींसें करतो. तसा तो रा-
मोपासक कपिभार असुर दलाचा विध्वंस करता झाला, परमार्थ रूप बाणें
करून शत्रु सैन्यांतील अभिमान स्वरूपी मुकुटांचें चूर्णच करून टाकिलें या-
वरून ही राक्षस गणांची व वानर समुदायाची लढाई झाली असें नाहीं, तर
जसें कांहीं नैराश्य चक्रें करून लोभ भाल्यास उडविलें स्वरूप साक्षात्का-
र बाणांनीं सिद्ध पताका खुडल्या बोध फरशानें मोह ध्वजास छेदिलें, अनु-
संधान परिघें करून जणु अविद्या रूप रथ चूर्ण केला, निवृत्ति अस्त्रानें प्र-
वृत्ति अस्त्राचा चुराडा उडविला, विरक्त गदेनें कुंजर काम विदारण केलें, क्रोध,
मत्सर, अहंकार इत्यादि घोड्यांस शमदमादि शस्त्रास्त्रांनीं पराजित केलें,
संकल्प विकल्प, द्वेष हींच कोणी कर्णकुंडलें समाधान शक्तीनें विदारून पा-
डिलीं. सारांश वानरांनीं असुर दलांचा चांगलाच चेंदा करून टाकिला, त्यां-
चे गजरथ, घोडे इत्यादि युद्ध सामग्रीस जमीनदोस्त करून टाकिलें (असा
अघोर प्रकार इंद्रानें अवलोकन करून तो बृहस्पतीस म्हणतो.)

इंद्र- हे वाचस्पती राजाधिराज रामचंद्र त्रिभुवनेश्वर, गुणनिधान हा
सीतेचें निमित्तमात्र करून आम्हां सर्व देवांस बंधमुक्त करावयाचें योजी-
त आहे, इतकेंमात्र खरें तर आतां त्या भक्तवत्सल भगवंतास आम्ही भे-

---

१ सूर्य. २ बाण. ३ डाव्या पायाला.

वकांनीं समयानुसार सामर्थ्यानुरूप साह्य करणें योग्य आहे. तस्मात् माझा चतुर व शूर सारथी जो मातली त्यास शस्त्रास्त्र युक्त दिव्य स्यंदन देऊन रामाकडे पाठवितों.

**बृहस्पती**- अहाहा तूं केवळ विवेक सिंधूच आहेस मनांत अणल्या प्रमाणें तुझे दिव्याश्व स्यंदनातें जोडून तो तूं मातली करवीं अतिसत्वर सुवेलाचल पर्वतीं जगद्वंद्य रामाकडे पावताकर.

**इंद्र**- अरे मातली सत्वर आपला स्यंदन सिद्ध करून राम साह्यार्थ जावें.

**मातली**- (वंदन करून) महाराज आज्ञेनुरूप हा दास कार्य करून येईल (निघाला आणि रामाकडे आला.)

**राम**- (संतोषानें) अहाहा जसें क्षुधितास उत्तम भोजन द्यावें किंवा तृषार्तास सीत जल मिळावें, किंवा व्यथितास निर्मल रसराज प्राप्त व्हावा. किंवा मरणप्राय झालेल्यांस सुधारस प्राशनार्थ मिळावा. किंवा रणांगणीं पाठिराखा धांवून येतां जसा संतोष व्हावा. तद्वतच हा पुरंदरानें मदर्थ समयोचित मातलीसह वर्तमान दिव्य स्यंदन पाठविला आहे. या गोष्टीचा मला मोठा धन्यता वाटते.

**मातली**- महाराज आपण रथावर आरोहण करून युद्धास प्रवृत्त व्हावें आपल्या चरण कृपें करून मी हा रथ रण मंडळी प्रेरिता होईन

**राम**- (रथास प्रदक्षिणा करून रथारूढ होतो)

साकी

गरुडावरती नारायण कीं उदयाचलीं[1] रवी[2] तो ॥
शोभत हून दिव्य रथावरि राम दिसोनी येतो ॥ ३७

**वानरगण**- (हर्षयुक्त मुद्रेनें) अहो, राम कार्यास साह्य करणार नाहींत असे दुष्ट या जगती तलावर या राक्षसां वांचून कोण असतील ते असोत, पहा तो चतुर व धोरणी इंद्र राजा त्रिजगदाधिपती जो रामचंद्र त्याचे सेवेस कसा समयानुसार उद्युक्त झाला दिव्य रथ पाठविला ही गोष्ट त्यानें स्वामींस संतोष दायक केली. सारांश हे विघ्न हारक सच्चिन्हच म्हणावयाचें श्रीरामचंद्रास

---

१ सूर्योदय जा पर्वतावर प्रथम होतो तो पर्वत. २ सूर्य.

कोठेंच उणेंपणा यावयाचा नाहीं हेंच निःसंशय खरें आहे.

**रावण-** (क्राधानें) अरे त्या हलकट इंद्रानें या मानवाच्या कार्यास आकाश पंथें रथ पाठविला काय?

### साकी.

कर कर कर कर दांत ओंठनें खाई रावण भारी
दिसूं लागलीं सर्व लक्षणें यमापरी तीं सारीं॥३८

### आर्या.

संताच्या लीलेनें॥ देखुनि ये निंदकांस बहु वीट॥
तद्वत रथास येतां॥ त्रास करी तो मनांत अतिधीट॥३९

### श्लोक

(शार्दूल विक्रीडितवृत्त)

हिंदूची क्रूर मूर्ति देखुनि बहू स्वांतांत संतापती॥
जैसे मूंछ सदां नसा खवळला चित्तांत लंकापती॥
रामाच्या कांपतो विटीबालसतो नाभिजि मंदोदरी॥
दुःखाधिक्य गमे तिच्या हुनि नया कीं इंद्रजीतापरी ४०

अरे दुष्टा मानवा, आतां मीं या अति दुःसह दुःखाचें परिमार्जन केल्या वांचून रहाणार नाहीं (मस्यंच्या आकर्ण पर्यंत ओढून तीव्र बाणाची वृष्टी करतो.)

**राम-** (उच्च स्वरानें) अरे शतमूर्खा मदोन्मत्ता, ही तुझी अभाट जिव्हा मीं क्षणार्धांत छेदन करण्यास समर्थ आहें तुझ्या बडबडींत काय अर्थ आहे? काय पराक्रम असेल तो येथें समरंगणीं प्रगट कर चल (रथ पुढें सरसावितो. आणि वायु वेगवत् बाणामागें बाण सोडितो.)

**विदुषक-** (घाबरल्या सारखें करून) सूत्रधारा, अरे हे अकाळ विकाळ स्वरूपी दोघ जण काळ महाकाळ तर नाहींतना? पहाते दावाग्नी वडवाग्नी सदृश संतप्त दिसत आहेत त्यांच्या रथाचा घडघड ध्वनी मेघ गर्जनेचे परी उठत आहे, परस्परांवरील सैन्यावर असंख्य बाणांचे वर्षाव होत आहेत, आणि त्या राक्षस-सैन्यावर तर त्या अद्भुत पराक्रमी वानरांनीं टोळांच्या धाडी प्रमाणें गहजब करू-

---

१ रावण २ यवन.

न दिला आहे, रुधिर धारांच्या जणु नद्याच वहात आहेत कीं काय? असें वाटतें, रण धुळीच्या वावटळीनें गगन आच्छादित झालें आहे, हें महान् घोर युद्ध अवलोकन करून सुरगण भयचकित होत्साते आपलीं विमानें सोडून भलती कडे पळ काढीत आहेत, ओहो आतां तर बाणाचा असा धडाका चालला आहे कीं, जेणें करून वाऱ्यासही फिरावयास रीग होत नाहीं. नक्षत्रें खळखळां खिंचवतात, विद्युत्पात होतात, ही धरणीमाई तर चळचळां कांपत आहे, सप्त पाताळें हेलकावत आहेत, शेष, कूर्म डचकून गेले आहेत, असो, तर सूत्रधारा मी आपला जातों, बाबा, कारण धट्टा खट्टा या दोघांच्या लढाईंत कुट्टा न खावों म्हणजे झालें

**सूत्रधार**— अरे वेड्या एकीकडे हो, तुझी या रथांच्या टकरीच्या धडाक्यांत बकरी सारखी वें वें होऊन जाईल याचा सारथी त्याच्या सारथ्यास, इकडची वानरें तिकडच्या राक्षसास एकसारखें झोडून मोकळे करीत आहेत.

**विदुषक**— अरे हा धांगड धिंगा अहोरात्र सप्तदिन पर्यंत चालला आहे तरी अद्याप कोणाचाच इंगा जिरला नाहीं; पण आतां दोघेही रथाखालीं उतरून पादचारी लढण्यास आरंभ करीत आहेत, त्यापेक्षां लवकरच शह निशह कायतो समजेल.

**रावण**— अरे कावळ्या, माझ्या तीव्र बाणें करून तुला व तुझ्या सैन्याला जर्जर करून टाकिलें आहे; त्यापेक्षां सत्वर शरण ये.

**राम**— अरे मूर्खा तुझ्याच सैन्यांतील बहुतेक वीर पुरुषांचा चुराडा उडाला तरीं अद्याप तुझी निशा पटत नाहीं काय? तुला आपल्या जीवाची गरज असेल तर तूंच मला शरण ये, शरण येणारांस मी मरण चिंतिणार नाहीं.

**रावण**— (फार क्रोधानें) अरे पोरट्या, औं तुला तर मी कोंवळ्या कांकडी प्रमाणें करकरां चावून टाकीन तूं तर माझ्या एका झडपीस देखील पुरणार नाहींस, हे लघुबालका प्राण रक्षण करून सत्वर निघून जा. यांतच मौज आहे नाहीं तर मी तुझी चांगलीच सेवा करीन हें पक्कें समज.

**राम**— (चापास बाण लावून) बरें तर या वल्गनेचें फळ मी तुला दाखविल्या वांचून रहात नाहीं.

साकी.

असंख्य नर हो भावांबु धीतुनि तरती ज्याच्यानामें
रावण रथिचे वारु छेदिले चौबाणीं त्या रामें ॥ ४१ ॥

रावण- अरे कार्ट्या त्वां माझ्या दिव्यरथाचे अनुपम्य वारू भग्न केलेस परंतु असे असंख्यात अश्व पुनःपुनः रथास जुंपण्यास मी समर्थ आहें. हें तूं जाणत नाहींस काय? तुला दुष्टबुद्धिरूप आकाबाईनें घेरलें आहे काय? हें तर मग होऊंदे (असें करतो.)

साकी.

यत्न न लागतां लंकापतिनें नूतन हय जुंपीले ॥
रथास आपुल्या राम शरानें भग्नमनी आणीलें ॥ ४२

राम- अरे दुष्टा तूं आपल्या स्वमुखें करून निज पराक्रमाचें वर्णन करतोस हें अति मूर्खत्व होय, ज्या मुखानी इतक्या वल्गना करीत आहेस, तीं तुझीं दशमुखें हा बाण एकदांच छेदन करील, अरे मतिमंदा तूं अद्याप तरीं विचार कर, पहा पहा हा बाण सुटलापहा.

चामर वृत्त

सायकासनास सार्ध सोमबाण लावितां ॥
चंडकीर्ण ज्यापरी नवग्रहांत शोभतां ॥
तथापरी राम तदां शरासवेग सोडितां ॥
रावणाचि पाडिलो शिरें पळांत लागतां ॥ ४३

अरे अरे, अर्धचंद्र बाणें करून मी ही या दुष्टाचीं दशशिरें एक समयावच्छेदें करून छेदन केली, असें असतां तीं पुनरपि पूर्ववत उद्भवलीं आहेत काय? तर.

साकी

चक्र वदन शर शीघ्र सोडितां छेदन झालीं-
सारीं ॥ शिरें पुनं भूपरी मागुती काढीतो अनिवारी ॥ ४४

रूर आणि कपि- (चिंतातुर होत्साते) अरे, या दुष्टाची दशशिरें पुनःपुनः उत्प-

---

१ घोडे. २ धनुष्यास. ३ चंद्र. ४ सूर्य ५ शोभणारा. ६ पुनःउत्पन्न होणारीं.

च होतात. अतां हा दशकंधर कसा मृत्यु पावेल हें कृत्य महान अनिवार्य दिसतें, असो हा केवळ युद्ध लीला प्रकार दृष्टीस पडला; असें झालें म्हणून आपण केवळ चिंताक्रांत व्हावें हें अश्लाघ्य होय, आपला स्वामी जो अनंत ब्रम्हांड नायक श्रीराम, तो हें महासंकट निवारण करण्यास समर्थ आहे.

मातली:- हे सकलचित्त चालका श्रीरामा, ह्या दश मुंडाचे हृदय स्थली अमृताची कुपिका आहे त्या योगें करून वारंवार शिरें प्रगट होतात. तर ती कुपिका फोडून टांकण्याचें शर संधान केलें असतां हें विघ्न टळेल असें खचित वाटतें

राम:- अरे मातली, अहाहा, तूं मनोभावें करून सारथ्य करीत आहेस यांत संशय नाहीं.

रावण:- अरे पोरा सिंहासीं जंबुकानें कितीही झरापटी घेतल्या किंवा सूर्यापुढें काडवातीनें आपला कितीही प्रकाश मिरविला तरी त्याची साम्यता होणार आहे काय? न्हणूनच तूं माझें शौर्य पाहून वैर्य सोडून धैर्य धरून दौर्बल्य धारण कर आणि निघून जा.

राम:- (अगस्तीदत्त बाण काढून) घेघेच आतां, चौर्याचें वैर फळ आलीच तुझ्या देह विसर्जनाचीवेळ (मग असें करतो.)

आर्या.

रामें बाणी धरणी सप्ताब्धी, अग्नि वायु शशि तरणी॥
यांची सत्वें योजुनि वधिनवदे ओघ रावणासरणी॥४५
गंधर्व किन्नर व्रज देवर्षी कूर्म शेष यम वरुण॥
यांची पूर्णाशक्ती ठेवी शरिं राम जानकी रमण॥४६
बाणाग्रीं ब्रम्हास्त्रा स्थापितसे राम मंगला यतन॥
तेरें झळके रविसम सर्वांचे दीपले तदा नयन॥४७॥

साकी.

सणणण णणणण निर्नाद झाला बाण सुटते वेळीं॥

---

१ पृथ्वी. २ सात समुद्र. ३ चंद्र. ४ सूर्य. ५ त्वरित. ६ समुदाय. ७ मंगलस्थान. ८ शब्दध्वनी.

धडडडडडडड वदनें पडली चुकेन लिहिलें भाळीं ॥ ४९

अरे दुष्टा, कुलाधमा, येच आलां स्वकृतीनें पूर्ण प्रायश्चित. (रावण प्राणास मुकला.)

साकी

रामशरानें मृत पावतो, पडतां रावण दांड ॥
घणघणघणशा दुंदुभिनादें दणाणलें ब्रम्हांड ॥ ५०
सुरनर किन्नर अंतरिं तोषुनि करिती जयजयकार ॥
रघुपतिवरती सुमनवृष्टी झाली तें अनिवार ॥ ५१ ॥
पुच्छ उभारुनि महदानंदें नाचति कपिगण वीर ॥
विजयी झाला वदती आमुचा राम सख्या रणधीर ॥ ५२ ॥

**विदुषक:-** सूत्रधारा, अरे काय हा रामाच्या बाणाचा प्रचंड प्रताप ज्यावेळेस श्रीरामानें आकर्णपर्यंत प्रत्यंचा ओढून बाण सोडिला त्यावेळेस त्याच्या त्या अघोर व अप्रतीम टणत्कारानें जणु महा प्रळयकाळच्या दत्त दरा प्रमाणें गर्जना केली असें भासलें, पृथ्वी डळमळूं लागली आहे आणि कित्येक शूरवीर भय मूर्छित होत्साते धाडकन् आपटले मला वाटतें ते पडले नाहींत तर त्यांनीं रामाच्या बाण प्रतापास साष्टांग नमस्कारच केले असावेत. जसा देवांत इंद्र अंडजांत गरुड, वानरांत वायुकुमर श्रेष्ट आहे तसाच हा पहा महाप्रतापी बाण सर्व शस्त्रास्त्रांत वरिष्ट होता, या अद्भुत बाणानें त्या धिप्याड व लट्ठ निरांजनी रावणाच्या दशमुंडाचा एका सपाट्यांत सप्पाउडविला, अरे पण नजाणो हें बाळ पुन्हां उठलें तर तें सकृत दर्शनी माझीच गठडी करून टाकील, मी आपला एरव्हींच करिष्ये. माझ्या अवडत्या प्राणास मुकेन, तो मेला किंवा नाहीं तें पाहूं काय?

**सूत्रधार:-** तूं अद्याप[१] भ्रमातच गटंगळ्या खात आहेस काय? रावण राजीच्या हृदय मंदिरीं अमृताची कुपी होती तिच्या योगानें पुनःपुन्हां शिरें निर्माण होत असत; परंतु या महा सामर्थ्यवान् बाणानें सायकास्त्रांतून सरतांच पूर्वी रामाच्या कर्णात सांगितल्या प्रमाणें रावणाच्या वक्षस्थळाचा चिद्रु

---

१ संतोषुन. २ पुष्प वृष्टी.

त्सम भेद करून अमृताचे कुपिकेस फोडून टाकून तीन शिरें उडविलीं आणि आपोआप रामाच्या भात्यांत येऊन शिरला. अशी ही दुर्धर गोष्ट घडली त्यापेक्षां त्याचा जीव भूतलावर तो भ्रमण करीत असेल असें वाटत नाहीं.

**राम:-** ( बाण काढून ) हें अजून याचीं सप्त शिरें तोडावयाचीं उरलीं आहेत काय? तीं तर आतांच छेदून टाकीन.

**लक्ष्मण:-** ( करजोडून ) हे श्रेष्ट बांधवा, तो दुष्ट निशाचरपती निःसंशय मृत झाला आहे आपण बाण मारिला असतां तो त्या उर्वरीत सप्तशिरांस स्पर्श करण्यास पात्र नाहीं, यास्तव पुढें युद्ध पुरें करावें असें वाटतें, चला आपण त्याची तो प्रेत काया अवलोकन करूं.

**राम:-** हे परम प्रिया बांधवा, हें सायकासन घे आतां आमच्या अवतार कृत्याचा मुख्य हेतू संपला ( इतक्यांत )

**विदुषक:-** (रावणाजवळ जाऊन पहातो) अरे हें याचें नाक आहे कीं नाकोबा आहे. श्वासोश्वसन बंद झालें असतां पक्का मेला असें समजतात, तर मी या मठ्ठलठ्याच्या नाकपुडीवर हात ठेवून पाहूं का नको बाबा. जरका नासिकोत्थुन वायूच्या सोसाट्यांत मीं सापडलों तर कोणी कडच्या दऱ्याखोऱ्यांत जाऊन पडेन याचा नेम नाहीं, अरे खरोच हा मेला. छातीयाची अठरामासे चांदी पहा याच्या अफाट छानाडाचे भगदाड जसें एखाद्या सखोलशा तलावाप्रमाणें दिसत आहे.याच्या या अवजड शरिरास उचलावयास कितीतरी अवचट खबरद धट्टे खट्टे असे धडिंग भडिंग राक्षस लागावे लागतील कोण जाणें, कांही पण सूत्रधार रावजी हा बंबेश्वर जेथून उत्पन्न झाला ती गुहा तरी केव्हढी अफाट असेल हो, अहो हा विचार राहो, पण ज्या मायेच्या उदरीं हें बाळ नवमास मलमूत्रांत लोळत पडलें असेल त्याठिकाणच्या कचेरीचा थाट कसा काय असेल बरें? असो हें हीन को पण या रावजीस बाळपणी जी दुग्धपान करवीत असेल तिच्या वक्षस्थलावर केवढाले दुग्ध पयोधर असतील बरें?

**सूत्रधार:-** काय मुलाच्या शंका !! अरे दिवट्या तुझीच का वेसनास मुला या विचारांत काय फायदा आहे.

**विदुषक:-** अहो तर तीच एका आणीकडे आमची म्हेस उडाली आहे म्हणून

म्हटले कीं, आयती दूध पिवून आणण्याची कांहीं टाकी लागली तर चांगलेंच.

**सूत्रधार:-** वाह्वा, वाः तुला काय, "टकाशेर खाजा और टका शेर भाजा" किंवा "सकट घोडे बारा टक्के" सारखेच, असो प्याद्‌मात केलीस, पहावेंरे, त्या श्रीरामावर व्योमघटांतून सकल कपेश्वर व सूर सुमनें सुमनवृष्टी करीत आहेत, महदानंदें करून वानरगण आपलीं पुच्छें उभारून नाचत आहेत, सर्व जनांस रामविजयाचा जो संतोष झाला तो त्रिभुवनांत मात नाहीं (राम व त्याचे शूर वानरगण त्या मरून पडलेल्या रावणा संन्निध येतात.)

**मारुती:-** हे रणरंग धीरा परमेश्वरा पहा या दुष्ट शत्रूच्या मुखांवर गीध्रपक्षी बसून ते त्याचे द्विदश नयन आपल्या चुंचुपुटानें फोडीत आहेत, वक्षस्थळांतून रुधिराभिसरण एकसारखें होत आहे आणि हीं प्रचंड शिरें मृत्तिकेंत मिळालीं आहेत, वाइटाचा परिणाम वाइटच.)

**बिभीषण:-** (अति दुःखानें) हे श्रेष्ठ बांधवा आज एकाएकी तूं मला सोडून गेलासना? ज्याच्या अगाध प्रताप बळास सकल राज राजे वाचीत असत, तो आज सर्व शक्तीहीन कसा झालास, हे चातुर्य समुद्रा, रावणराया, तूं वेदांचीं खंडें करून पाखंड मताचीं बंडें मोडून टाकिलींस तुला तप सामर्थ्यें करून संतति, संपत्ति इत्यादिक ऐश्वर्य प्राप्त झालें असून त्याचा एकाएकी कां बरें त्याग केलास. (नेत्राश्रु येतात.) त्वां सर्व देवांचे गर्व हरण करून त्यांस बंदींत घातलेंस, तात्पर्य अशा अशा अद्भुत करणीनें त्या पुराण पुरुष श्रीरामास तो निर्गुण असतां तुज करितां सगुणावतार धारण करावा लागला. त्या जानकीस आणिल्या मुळें भक्तवत्सल भगवंतानें आम्हांस प्रत्यक्ष दर्शन होऊन तो आमचा मित्र झाला. ही तुझी कीर्ती यावत् चंद्र सूर्य आहेत तावत् त्रिजगीं कायम रहाण्याजोगी झाली, परंतु तुजवांचून मला प्रस्तुत तर दशदिशा शून्यवत् भासत आहेत (ऊरबडवितो.) बंधो, एकवार तरीं मजकडे पहा, आतां मी रावण दादा असें कोणास बरें हाक मारूं? ही सर्व लंकापुरी विधवेपरी निस्तेज दिसत आहे, रावणभाऊ, अँ अँ अँ अरे मजशीं एकवार तरीं सप्रेमभावानें बोल बरें आतां मी कसेरें करूं, दादा तूं माझें ऐकत नाहींसना? दादा, दादा, इकडे पहा, इकडे पहा (फारच आक्रंदन करतो. तें ऐकिला असतां थरकांप होतो.)

राम:- अरे परम भक्ता, बिभीषणा, धैर्य धरून कांहीं विचार कर शरीरावर ये; नाशवंत वस्तूसाठीं किमर्थ शोक करतोस? हा मायामय जगडंबर पसारा केवळ मृगजळवत् आहे जसें वंध्यावल्लीचें फळ मुळापासूनच खोटें तसेंच हें सर्व आहे. जेथें आकार तेथें विकार आहेच आहे. तूं केवळ विवेकमूर्ती असतां अशाश्वताचा इतका शोक करतोस हें ठीक नाहीं "पुनरपि जननं पुनरपि मरणं" हा तर नित्य मायेचा खेळच आहे. पहा दूर दृष्टी देऊन या भव१भ्रमांतून शुद्धीवर ये (बिभीषण उगाच बसतो)

मंदोदरी:- सर्व स्त्रियां सहित येऊन पतिप्रेतास कवळून) अहो प्राणनाथ, आधींच कींहो मी सांगत होतें परंतु तें मनांत न आणिलां शेवट अशा रीतीनें गोड केलात काय? माझ्या समुळ सौभाग्याची महान् हानी झाली ना? अग आई आतां काय करूं? हें परम दुःसह दुःख कोणाला तरी सांगूं? शिव शिव, (तोंड झोडिते.) माझा प्राणनाथ केवळ गुणाचें जहाज असून तें आज या समरंगणरूप जलधींत बुडालें काय? आतां मी काय करावें बरें?

साकी.

जयलक्ष्मीतें देऊन जावई ...
पतिविण परि अम्हि दिसतों साचा सर्वहि दीन अनाथ॥५२

आर्या.

राघव केशरि जयुतो हारुनि लंकेश शीर्षिच्या मुक्ता॥
शकुनि दशगिरि ऐसें वर्णिल नर जो असे बहू वक्ता॥५३॥
प्राणपती वदानें फुटलें आजी समग्र सांठवण॥
भक्त विरोधी तूंही राहिल लोकीं सदैव आठवण॥५४

श्लोक

सांठीवलें अंतरि रामनांव॥ दाविलता लोकिं विरुद्ध भाव॥
विस्तारला हा त्रिजगीं प्रभाव॥ आम्हीं करूं कें विउपाय राव॥५५

(परमेश्वरा) आतां आमचा वाली तूंच आहेस.

१ सिंह २ लंका रूप द्रव्य ३ गोत्यांस. ४ युद्धांत. ५ संभाषण करता.

श्लोक

आह्मा देवा हृदय फुटतें जीव माझा गळाला॥
दुःखाग्नीहा सतत अदयें जाळितो काळजाला॥
दावूं कोणा वदन असलें म्लानजीवेश्वराला॥
लोकांमाजी मज गतधवा बोलती हा कपाळा॥५६

(स्फुंद स्फुंदून अत्याक्रोश करिते.)

राम:- बिभीषणा, तुझ्या ज्येष्ठ भ्राताची पत्नी ही महान् पतिव्रता असून ज्ञानाची तर केवळ लावण्य खाणीच आहे हिचें प्रातःकाळीं नामस्मरण केलें तर पातकाचें निरसन होईल अशी ही आहे. तूं तिला चार समाधानांच्या गोष्टी सांगून स्वस्थानीं जावयास सांग.

बिभीषण:- (मंदोदरी संनिध येऊन) अहो वहिनी बाई, आतां हा महाशोक आवरावा, जें होणार तें होऊन चुकलें "गतभ शोचामि कृतञ्च मन्ये" या वचनावर दृष्टी देऊन शोकार्णवांत मज्जित होऊंनये ह्या पूर्ण परात्पर सच्चिदानंद भगवान् श्रीरामचंद्र ज्याकर्मे करून अनायासें सन्मुख प्राप्त झाला त्या कर्माचें या वाचेनें दुःखभरीत आपल्या सारख्या स्त्रीनें उच्चारण करणें अप्रशस्त होय, माझा श्रेष्ठ बंधु अद्वितीय विरोधभक्ती त्रिजगीं प्रगट करून परिणामीं निजानंदीं स्थापित झाला, व्यवहार दृष्ट्या जें काय दुःख उत्पन्न वाटतें तें केवळ घोर भ्रमाचें लक्षण होय हें आपणही जाणतच असाल. तस्मात् मज बालकावर दृष्टी देऊन या सृष्टींत धन्यता रहावी म्हणून माझ्या वचनास मान्यता द्यावी. (तिचा कर धरून जावयास सांगतो.)

राम:- हे महापतिव्रते, मंदोदरी, तूं ज्ञानी असून हा अज्ञानीपणाचा भ्रम कशाकरतां करतेस, नाशिवंत वस्तू विषयीं असा गहन शोक करणें नीट नाहीं. त्याचा त्याग करावा, आत्मस्वरूप पूर्ण शाश्वत होय, हें अद्वैत ज्ञानानें अवलोकिलें असतां तेव्हांच समजून येतें; यास्तव मूळ दृष्टी देऊन विचार कर आणि ह्या सर्व स्त्रियां सहवर्तमान निजधामी गमन कर. भक्तजनांच्या तारणार्थ हें मायामय कृत्य आहे, असें सत्य समजून ऐस.

मंदोदरी:- (रामचरण वंदून) हे त्रिविधताप संहार कर्त्या, परमेश्वरा, श्रीरामा,

माझा महान पराक्रमी यजमान त्वच्चरणीं निजदेह अर्पण करता झाला. याचें मला अज्ञानपणें दुःख सोसवत नाहीं; परंतु सर्व दुःख परिहार कर्ता जो तो तूंच माझें अज्ञानत्व निरसन करून माझ्या हृदयीं ज्ञानसूर्य प्रकाशित केला तेणें करून मीं कृत कृत्य झालें महान् महान् तपोनिधींस जे चरण कमल अगम्य ते दर्शनास अनायासें मला प्राप्त झाले तेव्हां आतां शोक कसा उरेल ? असो (सर्व स्त्रियां सहित रामाज्ञा घेऊन गमन करिते.)

**बिभीषण:-** हे भक्त मानस चकोरघना आपली आज्ञा व्हावी म्हणजे या राजदेहाचा उत्तर प्रकार विधिपूर्वक होईल.

**राम:-** बिभीषणा आतां मीं सुवेलाचलीं गमन करतों, तूं यथा शास्त्र उत्तर क्रिया विधी संपवून सत्वर तेथें यावें (गमन करतो.)

**बिभीषण:-** (लंकाधीशाचें प्रेत संस्कार पूर्वक सिद्ध संगम नामक नदीवरती नेवविता.)

साकी.

वसंतिसरिता पावनभागीं सिद्धसंगमीं नेलें
राजकलेवर प्रळयाग्नी मधिं संस्कारें टाकीलें ॥ ५७

पुढें उत्तर क्रिया स्वतः ब्रम्हदेवानें सांगितल्या प्रमाणें केल्यावर तो प्रधानादिक सकल प्रजांसह वर्तमान सुवेलाचलीं येऊन रामपदावरी लोटांगण घालतो.

**राम:-** बिभीषणा तूं जिकडील तिकडे व्यवस्था करून आलास काय? आतां शोलता धारण कर.

**बिभीषण:-** (प्रेमयुक्त मंजुळ अशा अमृत वचनांनी) हे अमलदल राजीव नयना ब्रम्हांड नायका षड्गुणैश्वर्य संपन्न श्रेष्ठा आपण मजदीनावर कृपा करून ते विरिंची कर निर्मित लंकानगरी अवलोकन करावयास चलावें, आणि मग माझ्या माते (सीते) सह वर्तमान त्या अतिरम्य अयोध्यापुरीस स्वेच्छेनुसार जावें.

**राम:-** (हास्य वदन करून) हे परम भक्ता, बिभीषणा, ती लंका मी तुलाच दान केली आहे तिचें तूं निरंतर यथायोग्य राज्य कर मला तेथें येणें उचीत नाहीं, कारण.

श्लोक

कन्यादान करूनि घेति तिचिये ज्ञाते न कांहीं चरे

(येत. १ तिथल्या भाडकाळ कांहींच घेत नाहीं.)

कीं विप्रा प्रतिदान गेहे करुनी जातीन तेथें वरें
सत्पात्रीं दिधल्या पयस्विनिचिया दुग्धास घ्यावें कसें॥
लंका अर्पियली तुला म्हणुनियां येणें घडेना तसें॥ ५८

अरे विभीषणा, मी भरत भेटीस्तव तांबूल वर्जन व्रतादिक संपूर्ण व्रतें धरलीं आहेत; तस्मात् मीं लंकावलोकनार्थ येण्याचें वर्ज केलें एतद्विषयीं किमपीही साशंकित होऊं नको.

**विभीषण**- हे परम सद्गुरो आपण म्हणतां तेंही खरेंच आहे परंतु मला मात्र कसें वाटतें तें सांगवत नाहीं.

**राम**- अरे सौमित्रा, तूं मित्र नंदनादि वानर गणासह वर्तमान लंकेप्रत जाऊन समग्र देवांस बंध निर्मुक्त करून त्यांचा सादर पूर्वक सन्मान करावा. आणि छत्र चामरादि राज चिन्हांनीं विभीषणास विभूषित करून त्यास लंका राज्यीं मोठ्या थाटानें स्थापन करावें (लक्ष्मण वंदन करितो.)

**लक्ष्मण**- हे श्रेष्ट बांधवा आपले आज्ञेनुसार मी सुग्रिवादिकपिसमुदाया समवेत लंकापुरींत गमन करून विभीषणास शास्त्रोक्त मानानें राज्यीं स्थापन करतों.

**राम**- हे परम भक्ता विभीषणा, तूं सौमित्रासह स्वनगरीं जावें. रावणानें ज्यांच्या ज्यांच्या वस्तु हरण करून घेतल्या असतील त्यांच्या त्या त्यांस परत देऊन सकल प्रजाजन नीती शास्त्रानुरूप वर्तवून सुखी करावें, जसें ध्रुव, बली, उपमन्यू इत्यादिक परमभक्त याभूतलावर चिरंजीव आहेत तसा त्याच मालिकेंत तूंही सुखी रहा तुला तेथें राज्यपदीं स्थापन करतील त्यांचा आनंदें स्वीकार कर.

**विभीषण**- (वंदन करून) हे दीन रक्षका, महोदारा, आपली आज्ञा मला शिरसामान्य आहे, आपल्या चरणसेवा तसेंच करून हा दास पूर्वोक्त उपदेशिल्या प्रमाणें राजक्रम सुरळीत चालविण्यास समर्थ होईल. (लक्ष्मण, विभीषण, नळ, नीळ इत्यादि वीर रामास वंदन करून लंकेप्रत जातात.)

---

१ ब्राम्हणास. २ घर. ३ दुभाळ धेनू.

## प्रवेश ३

स्थल

## लंकापूर.

पात्रें.

लक्ष्मण — ............ रामाचा कनिष्ठ बंधू.
बिभीषण — ............ रावणाचा कनिष्ट बंधू.
सुग्रीव — ............ रवि पुत्र.
ब्रम्हदेवादि सुरगण — ............ देव समुदाय.



**लक्ष्मण.-** (लंकावलोकन करून) हे सुग्रीवा ही लंकानगरी महा देदीप्य मान व विशाल असून हींत नानाविध अमोलशा अतिरम्य वस्तु दिसत आहेत अहाहा ह्या ह्यांची अपूर्व रचना फारच सौंदर्ययुक्त आहे.

**सुग्रीव:-** खरेंच, असें कनकमय पट्टण पाहून चित्तास अत्यानंद झाल्या वां-चून रहात नाहीं; ह्यापुराच्या अंतर्बाह्य रचनेचा देखावा जोंजों अवलोकावा तों तों नयनांची शिराणी पुरत नाहीं. असो, सर्व सामग्रीची सिद्धता केली आहे; बिभीषणास राज्यपदीं स्थापन केव्हां करावयाचें?

**विदुषक:-** हे सूत्रधारा, आतां तर गड्या आमची खुप चंगळ आहे त्या थोर-ल्या बोवाचें ९ रावणाचें पुरतें वाटोळें झालें तेणें करून सुर नर किन्नर सुखी झाले; परंतु त्याचेच हे धाकटे बंधू बिभीषण रावजी राज्यासनी स्थापित हो-णार तेव्हां आतां मणगट बुडे पावेतों तूपपोळीचें संधान चांगलेंच जमेल ना-हीं बरें!

**सूत्रधार:-** जो ज्ञानी आहे त्यास रामचंद्राचा लीलाप्रकार पाहून ईश्वर भ-क्तांसाठीं कसकशीं महान् अघटीत कृत्यें करतो, हें समजून आलें असेल, परं-तु या ग्रहस्थाचें मन तूप पोळींच्या भानगडींत गर्क होऊन गेलें आहे, अरे ग्रह-स्था, विदुषका तूं तर भिक्षुकीची प्याद मान केलीस, वाहवा.

**विदुषक:-** अहो आमचें काम तें, नवरा मरो नवरी मरो आम्हांस दक्षिणा मिळाली म्हणजे झालें.

**सूत्रधार:-** बरें तर, तूं आपला या सुखाच्या लुटींत पाहिजे तितका हात मारू-न घे, किंचित ही डगमगूंनको, शेषावतार जो श्रीलक्ष्मण तो बिभीषणास मोठ्या थाटानें राज्यावर स्थापन करील तेव्हां तुम्हांभटां वाचून सर्वचखुंटेल, अशास-मयीं तूं खाण्यापिण्याची मोडशी होई पावेतों चैन बाजी करून घे.

**विदूषक:-** अँ अहाहा, हूं चांगलेंच संधान सांगितलेंस हा घमंडा नंदन तसें करावयास कधींही कसूर करणार नाहीं.

**लक्ष्मण:-** बिभीषणा, हीं दिव्य वस्त्र भूषणें परिधान कर

**ब्रम्हदेवादिसुरगण:-** (बिभीषणास छत्रचामरादि राजचिन्हांनीं अलंकृत करून वेद मंत्र घोषें सिंहासनीं यथाशास्त्र स्थापन करतात.)

**बिभीषण:-** हे विश्वंभरा भक्तकाम कल्पद्रुमा, हें सिंहासन आपल्याचरण कमल कृपें करून मला प्राप्त झालें. याचा वास्तविक हक्क माझ्या ज्येष्ठभ्रात्या-चा असून त्यानें तो निंद्य कर्मानें दवडिला यास कोणाचा उपाय नाहीं, असो याद-

ह्यापासून कोणत्याही प्राण्यांस अनुचित मार्गानें दुःखन होईल अशी प्रेरणा माझ्या हृदयीं वास करण्यास आपणच सर्वशक्तिमानपणें प्रवर्तक आहांत. (लक्ष्मण) सुग्रीव इत्यादि कपिसमुदाय व सुरगण, यांस नानापरीचीं अमोल वस्त्रभूषणें इत्यादिकें करून महत्प्रेमभरें सादरपूर्वक गौरवून त्यांचे चरण वंदन करितो.

**लक्ष्मण**:- बिभीषणा, आतां आम्ही सर्वत्र मंडळी सुवेलाचलीं सानंदपूर्वक गमन करतों (जातात)

## प्रवेश ४था.

स्थल

### सुवेलाचल

पात्रें.

राम ···· रावणारी. लक्ष्मण ······ रामाचा बंधू. इंद्रादीसुरगण ····· देवगण.
सीता ····· रामस्त्री. मारुतीसहकपि ··· वानरगण. बिभीषण ··· राव० बं० शर्मा त्रिजटा.
सी० दा०



लक्ष्मण- ( रामास वंदून ) हे श्रेष्ट बांधवा, त्वदाज्ञेनुसार, मी बिभीषणास लंका राज्यीं स्थापन करून सर्व मंडळी सहवर्तमान आपल्या चरण सेवे-शीं तत्पर झालों आहें.

साकी.

ब्रम्हादिक सुर महदानंदें करिती सुमनवृष्टी
रामावरती अगणित वाद्यें दणाणली तैं सृष्टी॥५९

शंकर- ( रामानें आगत स्वागत केल्यावर ) हे जगद्वंद्या रामा,

साकी- सत्येंशालवनामें झालों शीतल कंठीं रामा॥
लंकापतिवध वार्ता परिसुनि पावतिसुर विश्रामा॥६०

इंद्र- हे जगन्नियंत्या, आमचें सर्व संकट निर्मूल केलेंत तेणें करून जो महदानंद प्राप्त झाला आहे तो त्रिभुवनांत मात नाहीं, परमेश्वरा.

साकी.

त्रिदशाराध्या भक्त रक्षका आमुचा तूं कैवारी
रावण वधुनी अक्षा संकटें विलया नेलीं सारीं॥६१

राम- ( सर्वांचा सन्मान करून ) हे सुर वंदहो, यांत मी कांहीं विशेष केलें नाहीं हा जगन्मायेचा नित्य खेळच आहे, ती अनंत शक्ती आदिमाया आपणां सर्वांस जसें वर्तवील तसें करणें भाग आहे. तुमच्या पुण्यबळें करून आज हा सुदिवस प्राप्त झाला, हें मात्र खरें आहे. ( याप्रमाणें परम रसाळ संभाषणें होत आहेत तों इकडे त्या सभास्थानीं असें घडतें. )

साकी

अष्टनायका गाति नाचती नारद तुंबर गौन.
करिती विभुच्या सन्मुख ठेविति रामपदावरि भान॥६२

मारुती- हे ब्रम्हांड नायका, आपली अनुपमेय पराक्रमशक्ती अवलोकन करून सकल देवर्षी अत्यानंदांत निमग्न होऊन गेले आहेत, व त्वच्चरणांबुज दर्शनार्थ गण, गंधर्व, यक्ष, किंनर, सुरासुर, नर, वानर हे या दिव्य सु-

---

[1] सप्तलोकाधिपते. [2] आराम [3] देवांस पुज्य [4] नाशामत [5] गायन [6] चित्त.

वेलाचल पर्वतीं एकत्र झाले आहेत, आनंद जनक वाद्यांचे मधुर व सुस्वर असे नानाविध गजर होत आहेत, सुरांचे मुकुट परस्परांच्या मुकुटांशी आदळत आहेत. त्यावरचीं अमोल रत्नें भगणाहून तेजाळ दिसत आहेत, अशी ही अत्युत्तम आनंदाची लूट चालली आहे खरी. परंतु यांत ती सर्व शक्ती आदिमाया सीता नसल्या मुळें मी आपल्या आज्ञेची वाट पहात आहे. तेव्हां.

**राम**- हे भक्तवर्या, तुझाहा वाग्विलास या सुसमयीं परम संतोषास्पद होय बरें तर त्वां सत्वर लंकेंत जाऊन बिभीषणास सांगावें कीं, सीतेला मंगल स्नान घालून वस्त्रें भूषणें परिधान करवून सुखासनारूढ होत्साती पाठवावी.

**मारुती**- ही अमृत मात्र ध्वनी कर्णीं येतांच नमन करून.

श्लोक.

भुजंग प्रयात.

जसा बाळ सोत्कंठ सोधी स्वमाय, रमादर्शना जाई कीं वैनतेय ॥
तसा मारुती तें खपंथें उडाला, अशोकाख्य त्याकाननें नेंशिघ्रेठला ६३

**सीता**- ( मारुतीनें वंदन केल्यानंतर ) हे रामभक्ता मज कारणें तूं वारंवार अतिशय श्रम घेत आहेस. हे तुझे मजवर अगणित महदुपकार आहेत आतां माझी व माझ्या माणसख्याची भेट केव्हां होणार, तें निवेदन कर?

**मारुती**- महाराज अयोध्याधीश श्रीराम यांनीं त्या दुष्ट दशमुखी रावणाचा युद्धांत स्वपराक्रमानें वध करून लंकापतित्व बिभीषणास देऊन सकल देवर्षी बंधमुक्त करून सुवेलाचलीं सेनेसह वर्तमान ते सर्व सुखी आहेत. आपल्यास न्यावया करितांच मुद्दाम त्यांनींच मला पाठविलें आहे तर सत्वर चलावें.

**सीता**- ( आनंदाश्रु येतात. ) अरे हें तुझें रसाळ वचन अमृताहून ही अत्यधिक गोड लागत आहे. प्राणनाथाच्या व माझ्या वियोगास षण्मास होत आले. तेव्हां आतां तर मी आपले पंच प्राण केवळ वाऱ्यावर ठेविले आहेत, ते चिन्मय सुखदायक परम पवित्र पतीचे चरणकमल जेव्हां निज नयनीं अवलोकन करीन तेव्हां निजानंद रंगीं रंगत होईल.

१ गरुड. २ आकाशमार्गें ३ अशोकवन ४ आरण्यांत. ५ उभाराहिला.

मारुती-(बिभीषणाकडे जाऊन) हे बिभीषणा सीतेला मंगळस्नान घालून, व वस्त्र भूषणांनीं विभूषित करून सत्वर स्कंधावर बसवून यावें अशी श्रीरामाची आज्ञा झाली आहे.

बिभीषण- (आनंदानें मारुतीचा कर धरून) अहाहा मी ही याच विचारांत होतों, चलातर आपण आतां त्या जगन्मायेकडे जाऊं (जाऊन वंदन करतात.)

सीता- हे विभीषणा, हे मारुती तुमची रामचरणारविंदीं परम भक्ती आहे तस्मात यावत् चंद्रसूर्य आहेत तावत् तुम्हीं चिरंजीव सुखी असावें. बिभीषणा त्वां लंकेचें राज्य सुखरूप व न्यायें चालवावें.

बिभीषण- हे प्रणवरूपिणी, सगुण भरिते, जगन्माते, त्वां स्वलीले करून अनंत ब्रम्हांडाची रचना केली आहेस. ब्रम्हा विष्णु महेश। यांतुझ्या निद्रीं बाळा करवीं उत्पत्ती स्थिती लय तूंच करितेस, हें गुप्त सार तुझें तुलाच सर्व माहित आहे, रावणानें कापट्यें करून तुला लंकेंत आणिलें ही तरी तुझीच इच्छा, परंतु या योगें करून सकल सुरवर बंध मुक्त झाले आणि आम्हां सर्वांना जगदाधिपती परम मित्र झाला हा तरी तुझाच उपकार असो, हे अनादिसिद्ध आदिमाये, आतां कृपाकरून मंगलस्नान करावें वस्त्र भूषणें स्विकारावीं आणि स्कंधावरी रघुनंदनाकडे शीघ्र चलावें.

सीता- (हे बिभीषणा.)

साकी.

रामनकरितां मंगलस्नाना करूं कसेंमी आधीं
परमदूषणा देतिल जन हे मना कल्पना बाधी॥ ६४

मारुती- माते, श्रीरघुनाथानेंच बिभीषण वचनानुरूप मंगल स्नानादि व्यापार तुवां करावा म्हणून आज्ञा दिली आहे तस्मात् आमची विनंती मान्य करावी.

सीता- बरें आहेतर (बिभीषण मारुती एकीकडे बसतात.)

साकी.

बिभीषणाचीपट्टराणी हे शामा त्रिजटासंगें
उपचारानें सकल घेउनी आली ते वेगें॥ ६५

मणिमयचौकीवरती बसवुनि चरणा प्रक्षाळीलें
सादरपूर्वक मृगमद चर्चन अंगानें केलें ॥ ६६
त्रिजटा स्वकरीं मळी काढितां उष्णोदक शर्मेनें
ओतावें तत्कृशतनु देखुनि लाजावें शर्मेनें ॥ ६७

त्रिजटा:- मात हे दिव्यालंकार व हीं अमोल्य वस्त्र भूषणें परिधान करावीं.

सीता:- अहा हीं बिभीषणांनीं पाठविलेलीं दिव्य वस्त्र भूषणें त्याच्या भक्तिस्तव ग्रहण करतें (परिधान करिते.)

विदुषक:- सूत्रधारा " एकनूर आदमी तो हजारनूर कपडा, लाखनूर गहिना और कोटनूर नखरा," हें अगदीं खरें आहे पहा आतां ही सीताबाई कसें झळक फळक मकर्ण दिसत आहे हिच्या कर्णीं सूर्य मंडळातुल्य सतेज अशीं दिव्य तारकें सुशोभित दिसत आहेत. या रत्न खचित डागडागीण्यांचा चमचमाट मळय विजेहूनही विशेष आहे असें वाटतें, या स्वर्ग त्रिभुवनांही दुर्लभ अशा भासतात, हिनें आपल्या विशाळभाळीं कुंकुम तिलक लावून त्याच्या खालीं अत्युत्कृष्ट कस्तुरी रेखिली आहे तेणेकरून हिचा मुखेंदु पूर्ण चंद्रास लाजविणारा दिसत आहे, अरे मी कितीतरी वर्णन करूं हें देदीप्यमान सुस्वरूप पाहून मला अत्यानंद होत आहे, सारांश या सालंकार दिव्य तनूची कांती दशदिशांस फाकून गेली आहे बाबोर, नाहींतर आमचें बटकूर काय ध्यान दिसतें कीं पहातांच पळून जाऊन देशांतर करावेंसें वाटतें.

सूत्रधार:- चालू विषय सोडून स्वपत्नीचें एकाएकी वर्णन करावयास लागलास हें काय?

विदुषक:- अरे मी आपली उगीच तुलना करून पाहिली आमची प्रियपत्नी जेव्हां का खोट खुरासणीच्या तेलानें थोबाड सारवून डोळ्यांत काजळीचा ढीग लोटून देते व मेणांत कोंद कोंदून कुंकाचा मळवट भरिते आणि धशा खशा लुगडें नेसते तेव्हां काय हे डंबीचीच वडील बहीण आहे कीं काय? असें चिंतोपंतास वाटतें, असो कोठवर सांगावें! सारांश ह्या नकत राव जेव्हां तयार होतो आणि तशांत एकांनीं प्रीयकर चुंबन घेण्याचा प्रसंग येतो तेव्हां आतां कथन केल्या प्रमाणें सुस्वरूप पाहून व तें हिरवें पिवळें राजीव नेत्र देखून आ-

१ धुतले: सन्मानपूर्वक ३ उष्णोदक

कारी बाईस आमची भेट घेतल्या यांनून रहावत नाहीं.

सूत्रधार- (पोट धरून हंसतो) काय मुलगा आपल्या घरची गुह्य गोष्ट चौघांत विनाकारण आणावयास कांहीं तरीं यास लाज वाटत आहे काय?

विदूषक- अरे असें लाजूं लाजूं केलें असतें तर नाटक पण नाटकच असतें.

त्रिजटा- हे सार साक्षी, जानकी, मी या दिव्य फलादिकें करून तुझी ओंटी भरतें हिंचें गृहण करावें.

सीता- (ओटींत घेते) हीं आस्वादवत अमृतफळें बहूत सुंदर आहेत.

शर्मा- बाई, आदिमाये, हीं त्वां भक्षण करावीं.

सीता- (मारुती, बिभीषण, त्रिजटा, शर्मा, इत्यादिकांस एक एक फळ देऊन एक आपण भक्षिते आणि मुख प्रक्षालन करिते.)

बिभीषण- (त्रिभुवनैक मोल मणि सीतेपुढें ठेवून) हे जगन्माते माझ्या ज्येष्ठ भ्रात्यानें हा सुंदर मणि सदनीं ठेविला होता तो आपल्यास मी मनोभावें करून अर्पण करीत आहें याचा स्वीकार करावा.

सीता- (फार चांगलें आहे (गळ्यांत घालते)

बिभीषण- मारुती- (सीतेचे चरणकमल वंदून) हे स्वामिनी

साकी.

रत्नजडितश्याशिबिके माजी चलाबसोनी माते ॥
पोंहोंचवाया तुज लंकेची सर्वहि सेना येते ॥ ६८॥

अठरा क्षोणी प्रबळ वाद्ययंत्री वाजावयास लागले आहेत लंकेची सर्व सेना पोहोंचवावयास येत आहे तर माते या रत्न जडितशिबिकेंत बसून चलावें आम्हीं आपल्या चरणसेवेस तत्पर आहोंत.

सीता- (शर्मा आणि त्रिजटा यांच्या कंठीं मिठी घालून) प्राणसख्यां हो पुढें तुमची व माझी भेट केव्हां होईल बरें?

शर्मा व त्रिजटा- (आपल्या कुरळ्या केसांनीं जानकीचे चरण झाडून नेत्रांस पाणी आणून) हे प्राणसखे, राम ललने, आम्हां दीन किंकरींस त्वां विसरूं नये.

सीता- खरेंच तुमचे असतीम महदुपकार मी कधींही विसरणार नाहीं तुम्ही स्वस्थ सुखी असा (सीता पालखींत बसते)

पालखींत

विदुषक— सूत्रधारा, अरे ह्या देदीप्यमान पालखींत बसून मोठ्या थाटानें कोणाचें प्रकर्ण चाललें आहे रे शिबिका भरजरी किनखापानें आच्छादिलेली आहे जसा रत्नपारखी अमोल दिव्यरत्नें पेटींत घालून मोठ्या तजविजीनें राखतो; किंवा संतलोक स्वहृदयस्थ आत्मज्ञान अज्ञानापुढें सहसा न आणितां तें तसेंच अंतरीं सांठवितात किंवा कृपण पुरुष निजधनास गुप्तपणें रक्षितो तद्वत् हें वडें प्रकर्ण मोठ्या तजविजीनें चालविल्याचें दिसतें. मारुतीराव आपलें पुच्छ उभारून सव्यभागीं चाललेच आहेत. बिभीषण वामभागीं चालला आहे पुढें असंख्य सेना एकसारखी मोठे थाटानें जयजयकार शब्द पुकारीत चालली आहे नाना परीचीं जयवाद्यें झडून राहिलीं आहेत, तेव्हां हें आहे तरी काय?

सूत्रधार— अरे ही जगन्माता सीता कवेलाचलीं रामाकडे जात आहे.

विदुषक— वाहवारे स्वारीचा थाट!!! वारे वः यौं, याचेंच नांव गम्मत आमची बायको तर कधींच अशा थाटानें आमचे भेटीस येत नाहीं. याचें कारण काय?

सूत्रधार— अरे तुझ्या स्त्रीची आणि सीतेची बरोबरी आहे काय?

विदुषक— कांवरे असें कां म्हणतोस? आमची काय हेडंबा आणि ही काय गोडंबा आहे काय? हिला काय दहापांच नाकें आहेत.

सूत्रधार— व्हावा हा दिवरा जिकडे शिरेल तिकडे शळवळवाच्या पावसा प्रमाणें वाग्जल्पना कोसळील (स्वारी कवेलाचलीं प्रवेश करिते.)

---


## प्रवेश ५

स्थळ

### राम आश्रम

पात्रें

| | | | |
|---|---|---|---|
| राम | दशरथनंदन | वानरगण | रामसेना. |
| सीता | रामपत्नी | बिभीषण | रावणाचाबंधु |
| मारुती | रामदूत. | इंद्रादी देव | सुरसमूह. |



**मारुती, बिभीषण:-** (रामास वंदून) हे राजीवाक्षा श्रीरामा त्वदाज्ञेनुरूप आमची माता सीता आणली आहे.

**वानरगण:-** बा रामा आम्ही तुझ्या चरण कृपेस्तव रानोमाळ हिंडलों व कसकसे कष्ट सोसले हें तूं उत्कृष्ट स्पष्ट जाणत आहेस आरंभिलेलें कार्य तुझ्या प्रतापबळें करून सिद्धिस गेलें. परंतु जिच्याकरितां इतकी खटपट केली ती सीतासती अद्याप आमच्या दृष्टीस पडली नाहीं इतकेंच नाहीं तर उलटें तें नेंडे बुकडे राक्षस गण आम्हांस यथास्थित मुष्टिमोदक बक्षीस देतात. तेव्हां हीच काय शेवटीं देणगी? तुमचें काम झालें आतां आमची कशाला गरज असेल? ठीकच आहे "गरज सरो आणि वैद्य मरो" वाहवा "तुम्ही आम्ही एक आणि कंबाखिला मेख." असें कसें बरें?

**राम**:- बिभीषणा तूं आपल्या सेनेचा चांगला बंदोबस्त ठेव हे माझे परम मित्र वानरगण दुःखी झाले असतां त्यांत मला कोणतेंही सुख नाहीं, मी त्यांच्या भक्ति स्नवश्रृणी आहें.

**बिभीषण**:- (वेत्रपाणीस निवारून) अहो महाराज या वानरांनीं पालखीसंन्निध अतिशयगर्दी करावी दुरून डोक डोकावून पहावें, पुच्छें उभारून अपूर्व नमस्कार करावें, मला त्यांस असें न करण्याविषयीं कधीं कधीं वाटेनें निवारावें लागलें.

**राम**:- हे वायुनंदना पालखीवरील अच्छादन एकीकडे सारून तीजनक बाळी सर्वजनांस अवलोकूं द्यावी.

**मारुती**:-(पडदा सारून) हे मित्रहो त्रिभुवनपतीची रत्नखाणीराणी पहाण्याची शिराणी सर्वांनी यथेच्छ पुरवून घ्यावी.

**वानर**:- (विस्मित होऊन) आपआपल्यांत, हिचें मुखकमळ चंद्रकांतीहून सुंदर दिसत आहे भोंवया धनुष्याकार आहेत नयन कमलें विलोल मृगशावाक्षासम भासत आहेत. नासिकाचे सरळत्वास चांपेकळीचीउपमा साजेल असें वाटत नाहीं. मस्तकींचे काळे कुरळे केंस शिखावर्णास अजिंक्य आहेत अधर ओष्ट जणु दिव्य पोंवळींच भासतात. कुंकुम विराजित भाळ अत्युत्कृष्ट शोभायमान दिसतें, कर्ण कुंडलें चंद्र दिवाकरा सम झळकत आहेत. परंतु उर्वरित शरिरावयव दिव्यांबरें आच्छादित असल्यामुळें त्याविषयीं कसेंकाय आहे तें सांगवत नाहीं.

**राम**:- (अंतर्भाव जाणून) कांमित्रहो तुमची इच्छा परिपूर्ण झाली कीं, नाहीं?

**वानरें**:- होयपण सीता माईनें मस्तकावरून पदर घेतला आहे आणिबहुतेक शरीर भाग वस्त्रालंकारें करून आच्छादिला आहे या मुळें तिला आमच्या सारखें पुच्छ वगैरे अवयव आहेत किंवा नाहींत हें समजत नाहीं.

**राम**:- मारुती, ह्यानिष्कपटी मित्रांच्या नयन तृप्त्यर्थ जानकीस न लाजण्या विषयीं सांगावें.

**मारुती**- (सीतेस वंदून) मातुश्री श्रवण करावें.

आर्या.

पदरानें सारुनियां दावाहो अंग आपुलें कपिनां॥
श्रीरामाज्ञा पुरवा चित्तीं आणूं नका किं हा नंयना॥६९

**सीता**:- (सलज्ज मुद्रेनें) मारुती पतीची आज्ञा भंग न करणें हाच आमचा स्त्रि-यांचा मुख्य पातिव्रत्य धर्म होय (तसें करिते.)

**वानर**:- अहाहा ही जगज्जननी अनिर्वाच्य स्वरूप आहे; परंतु आपल्या व हिच्या शरीर रचनेंत पुच्छा वांचून बहुतेक सादृश्य आहे, हें असो पण ह्या-विषयीं आपण राम भाऊस विचारूं.

**राम**:-(वानरांचा मनोभाव समजून) मित्र हो मनुष्य जातीच्या प्राण्यांस ब्रह्म-देवानें पुच्छ निर्माण केलें नाहीं तेंजरी असतें तरीं ह्या रचनेस सुशोभित दिस-तें च ना, समजलांत?

**दुष्टजन**:- (मनांत) अहो या अनुपमेय सुस्वरूप सुंदर सीतेस तो दुष्ट दशकंधर षण्मास पर्यंत उगाच कसा राहूं देईल? यास्थळीं कांहींतरीं घोटाळा होण्याचा संभव नाहीं काय?

**राम**:- (सर्वांतर जाणून व्यंकटा भ्रुकुटी करून) सीते मी त्या दुष्ट रावणा-स मारून तुला सोडवून आणिलें; परंतु तूं तेथें षण्मास होतीस यामुळें स-कल जन मन साशंकित झालें आहे यास्तव मन मानेल त्या वाटेस तां जावें उ-रावरील पाषाण उतरल्यावर किंवा राग गुल्में विरून गेल्यावर अथवा जन्मा-धास दिव्य नयन प्राप्त झाल्यावर जसें सुख प्राप्त होतें तसें माझें एक वचन व्रत शेवटास गेल्यामुळें मला सौख्य वाटत आहे. आतांतूं क्षणभर ही येथें उ-भी राहूं नको. तुला पाहिजे तिकडे जाण्यास दशदिशा मोकळ्या आहेत पहा-नेसतर खरें कीं, मी सर्व संग परित्याग करून उदासपणें अघोर काननांत स्वेच्छाचारी विचरत आहें माझ्या मनीं कोणतीही कामना उरली आहे असें समजूं नको तुला पाहिजे तर तूं भलता एखादा नृपनाथ वरावा. मला कैकेयीनें जेव्हां अरण्यवास करण्याची आज्ञा दिली तेव्हांच मी तुला मज संगें न येण्या-विषयीं पूर्वीच निषेधिलें होतें असें असून तूंच हट्टानें आलीस अगे, मी राज्यो-पचार त्याग करून वनचरांस मित्र केलें, वल्कलें धारण करून कंदमुळें सेवन क-रून रहातों, तृण शय्येवर शयन करीत असतों. याकरितां सीते तुला माझ्या स-

गतीनें काय करावें आहे बरें? सकळ उपाधी टाकून या अघोर कांतारीं निरंजनी येऊन राहिलों आहें. प्रपंच व्यसनाचा त्याग केल्या सारखेंच झालें आहे. तस्मात् व्यर्थ कष्टी न होतां प्र दृष्टी सन्मुख उभी राहूं नको, चल जा येथून नीघ (असें म्हणतांच.)

सीता- (कर्दली स्तंभवत् धरणीवर आंग टाकून) शिवशिव शिव हे जगन्निवासा या दीन दासीवर दुःखद् शल्यरूप कस्यांत बीजा कशा बरें एकाएकी कोंसळल्या? या शब्दरूप सांडसांनी माझें हृदय खंडित केलें. हे वाग्बाण अकस्मात टोंचत आहेत (गहिंवरून) हे धरणी माते जसी कुमुदिनी सूर्यनारायणाच्या प्रचंड किरणांनीं करपून जाते तद्वत माझी अवस्था झाली आहे (अश्रुपात होतात) हे जगद्वंद्या राजीव नेत्रा, आनंद कंदा, गुणसमुद्रा श्रीरामा आपल्या वियोगवन्हीनें षण्मासपर्यंत मला जाळजाळून घेतलें असा पूर्व कर्म गहन म्हणून तें महान विघ्न टळून मला त्वच्चरणाचा लाभ पुनरपि प्राप्त झाला. हा आनंदाचा दीन उगवला असें समजून मी परम समाधान मानीत होतें. परंतु कर्माचि गति अनिवार आहे जगदीश्वरा.

साकी

कामधेनुचीधार काढिली; पात्रीं चिकशेराच्या
आलाअसतां काय करावें विपरित खेळ विधीच्या॥७०
क्षुधाप्राशनीं दुर्धर विषसम झालाजर परिणाम॥
दोष कुणाला द्यावा न स्मरा त्यागी मज कां राम॥७१

आर्या

मंत्तनु लोह परिजरी गणिलीतरि रामचरण परिसाची
हृदयगमे ससंगति घडुनीझाली कशी न कनकांची॥७२

माझ्या प्राणप्रियः श्रीरामा कडून असा अद्भुत प्रकार कधींच व्हावयाचा नाहीं, असें असतां हें मद्दैव कसें ओढवलें बरें? कालत्रयींही ही गोष्ट ध्यानीं मनीं स्वप्नीं येण्याजोगी नव्हती ती एकाएकी कशी प्राप्त झाली.

---

१ अ म्हं स्वाच्चा २ अमृत ३ माझें शरीर ४ सोन्याची

साकी.

मृगेंद्र[1]रक्षक असतां जंबुके[2] त्रास कसा मज देतो
खगपत्याश्रय[3] असुनी अहि[4]चा डंख कसा चालेतो ७३

दिंडी.

कल्पतरूच्या[5] छायेंत मी बसोनी॥ कोणताही अन्याय तो नसोनी॥ मज मारी तो राग मनि धरोनी॥ दुष्ट दैवाची कैसिही कहाणी॥ ७४॥ राम पद लीला वारिधींत[6] मीन[7]॥ असुनि मी कां मज ठांव ही मिळेना॥ जाउं कोठें हो राम कृपाकाश॥ कोपलेंसें कां को पुसावकाश॥ ७५॥

मला तर बाई शब्द अग्नीतून निघून फुपाट्यांत पडल्या प्रमाणें झालें आहे, अग बाई, इकडे आड आणि तिकडे विहीर व मध्यें मी अशी अवस्था झाली आहे. हे प्रभो दीनदयाळा (कपाळावर हात ठेवून) माता आपल्या स्वबालकास विषपान करवील, किंवा पिता प्रियपुत्र त्याग करील अथवा धनी स्वसेवकास निष्कारण दंडील तर तेथें त्याचें काय चालणार आहे त्रिभुवनपतीचा चरणाश्रय सुटला तर मी कोणास शरण जावें? मी आणि राम हे अर्धांगी असतां आज अकस्मात त्यांनीं माझा कां बरें त्याग केला? सूर्य किरणावर कोपेल, समुद्र लहरींशीं दावा करील, अमृत आपली मधुरता सोडील, कल्पवृक्ष स्व शाखेशीं अबोला धरील. तर त्याचा दोष कोणास लावावा बरें? भागीरथी किंवा अग्नि जसे निजांगीं शुद्ध आहेत तशीच मी या अशोकवनामध्यें शुद्ध रूपें दिवस काढीत होतें, ध्यानीं, मनीं, स्वप्नीं देखील रामचरण विमल कमलाच्या निजध्यासा वांचून मला यादीन दुबळीला कांहींच कीहो माहीत नाहीं. माहेरी इतक्या अन्यायास्तव मेरू इतका दंड व्हावा काय? आईग जी कामिनी यत्किंचित् मंद वातें करून देखील थरथरां कंपायमान होऊन पडणार तिला वज्रघात कशास पाहिजे? परमेश्वरा आतां माझी तुला सत्वर करुणा येऊंदे या गोष्टीस माझा काय उपाय आहे बरें? विना कारण दुष्ट जन मजवर गहजप करतील तर सहेचनेव करो.

---

१ सिंह २ कोल्हा ३ गरुडाश्रय ४ सर्पाचा ५ कल्प वृक्षाच्या ६ समुद्रांत ७ मत्स्य

त परंतु हे सर्वेशा सकल चित्तचालका तूं सर्व जाणत आहेस. हा दीन धेनू चिखलांत गुंतली इजला तुजवांचून कोण बरें बाहेर कादील, असो, अरे वानरानों राम भक्तांनों आतां मध्यामी पेटवून एक महान अग्नि कुंड तयार करा त्यांत मीजर शुद्ध नसेन तर जळून खाक होईन. जर शुद्ध असेन तर जगदाधिपती मत्प्राणपती जो श्रीराम त्याच्या चरणकमलीं भृंगी होण्यास पात्र होईन.

**वानरें**- (रामा सन्मुख येऊन) रामा हा अघोर विलाप ऐकून आमचीं हृदयें तर दुभंग झालीं आहेत आमची आई आतां दिव्य घेईन म्हणते, हा घोर अनर्थ परम दुःसह आहे, बा रामा आमच्या मातेस दुःख देऊं नये तिनें तुझें काय केलें बरें?

**राम**- नाहीं नाहीं जनापवाद असून त्या दुःखाहून ही मला अत्यधिक वाटतो. यास्तव मित्रानों, तुम्ही या कामांत उगीच ओढाताण करूं नका, ती दिव्य घेत असल्यास सत्वर घोर अग्नि सिद्ध करा म्हणजे सत्यमिथ्य कायतें आतांच दृष्टिगोचर होईल. हातच्या कांकणास आरसा कशास पाहिजे. पाहूं काय होतेंतें?

**वानरें**- (अश्रु वहातात) आई माते या समयीं तुझ्या पुढें बोलावयास आम्हीं समर्थ नाहीं आपल्या पूर्वोक्त आज्ञेनुसार महान अग्नि सिद्ध केला आहे

आर्या.

ज्याच्या ज्वाला जाती आकाशीं अग्नि तो असा केला
हा उनि तटस्थ नयनीं सीतेनीं निरखितां तदा [१]लीला ॥७६

**सीता**- (रामाकडे दृष्टी भरून पहाते) आणि अग्नि साभिध्य जाऊन कुंडास त्रिवार प्रदक्षिणा करून गळ्यांतील सुमनहार त्यास वहाते; व

साकी.

सत्य सत्य मी शुद्ध नसे जर तरि मज अनला जाळ
जनापवादा पासुनि वरचा [२]ऐसा अंतःकाळ ॥७७

१ अग्नि २ मरणोत्क्रमण समय.

हे अग्नि नारायणा, खरोखर कोणतेंही पापाचरण मी स्वप्नांत देखील अ-व ऐकिलें नाहीं असें असतां यात्रिविधतापजनांच्या माऱ्यांत मी सांपडून पर-म विव्हळ होत्सातीं दिव्य घेत आहें. तर दुधापाण्याचा निवाडा करणें तुजक-डे आहे. या प्रसंगीं मला अधिक बोलवत नाहीं, सर्वस्वीं तूं आहेस (राम, राम, राम असे त्रिवार म्हणून अग्नींत उडी घातली.)

**विदूषक**- अरेरे, हें कशाचें बोवा नाटक? येथेंतर माणसें बळी जातात अरे ज्या सीते करितां रामाचें व रावणाचें अघोर युद्ध झालें तिचा परिणाम असाव्हा वा कींकाय? पृथ्वी आपली कन्या भाजली म्हणून थरथर कांपत आहे, जिकडे तिकडे एकच अहःकार झाला आहे, सकल सुरवृंद व कपिगण या महान् अघटित कृत्यानें शोक निमग्न होऊन मूर्छागत पडले आहेत काय हा प्रळय काळतर नाहींना? धुराचे कल्लोळ चालले आहेत, या महान अग्नि तापें करून सप्त समुद्रांस कढ आला आहे. वैकुंठ कैलासादि महान स्थळें डळ-मळून गेलीं आहेत. आकाशही सकंपसें दिसतें अपार नक्षत्रें रिचवतात हा-य हाय हा काय कहार !!! बाबारे आजपासून अशा नाटकांत येणें आणिसा-खर खाणें बरोबर आहे, अरे हे एक प्रकारचें सती जाणेंच म्हणावयाचें, सती न जाण्याचा कायदा करणारे विलायती विद्वान गडी ह्या वेळेस कोणीक-डे पळाले होते.

**सूत्रधार**- अरे या वेळेस सर्व लोकांच्या मनाची स्थिती अति दुःखभरित झाली असेल यांत संशय नाहीं परंतु हा लीला प्रकारच तसा आहे बाबा तुं आ-पला अव्वाट विजातीय कल्पना बळेंच खेंचाटून आणून पेचांत पडूंनको.

**विदूषक**- वाहवारे सूत्रधारा, हा तर शत्रु तोंड धरून बुक्याचा मार झाला कांहीं तरी दुःखांश कमी व्हावा म्हणून मी कधें बोलतों तें तुम्हांस कुधें कसें लागतें? बरेंतर तेरेबिचुप मेरेबिचुप आय आपला झेणस्पिक् होनो. आ-ची माची जीभकाळी, वेल, तर, मग पुढें अच्छा तरेसे चलनादेव.

**मारुती वगैरे सर्वकपिगण**. (ढळढळां अश्रु वहातात) माते आम्हां बालकां-स टांकून तूं गेलीसना? कायही आमची कर्मरेषा? कसें करावें आमचें जी-वन व्यर्थ आहे तुझें चरण कमल आम्हीं केव्हां पाहूं? तुलामहा काळाचेंही

भय नसून हा काय मकार झाला हरहर ईश्वरा, आमची मातुश्री आम्हास तै कर भट्टेद (इतक्यांत मोठा चमत्कार होतो.

## श्लोक

पृथ्वीवृत्त.

नदा अनल गुसती सतिवरी निघूं लागली
दिसे नवतनू प्रभा रविसमाननी चांगली ॥
त्रिविष्ट पिंहि माईना जनमनोद्भुता नंदतो
चरित्र कथवेनतें कविजनां क्षमामागतों॥ ७८

(सीतादिव्य स्वरूपें अग्नि आंतून येते.)

वानरें- अत्यानंदानें सीता चरणाब्ज वंदून उड्या मारितात) अहाहा, भूप,भूप, आतां हा आली आमची आई आली, मातेच्या अद्भुत लीलें करून आम्हांस परमानंद झाला तो आमच्यानें वर्णवत नाहीं हें स्मरण न भूतो नभविष्यति, माते तूं धन्य धन्य आहेस

बिभीषण-(सीता चरणीं लोटांगण घालून) अहाहें विलक्षण अगाध नवल पाहून जो अत्याल्हाद मास होत आहे त्यास उपमा देण्यास कोणताही पदार्थ सयुक्तिक सा दिसत नाहीं रावणानें व्याभिचार केला नाहीं हें ह्यांत सर्वांस दिसून आलें, त्याचा तरी मी आनंद कां न मानावा?

सुरगण- (वंदून) धन्य धन्य हे जनक नंदिनी तूं धन्य आहेस, हा तुझा अगाध महिमा भक्तजनास भवांबुधीतून पार पाडावयास आधारच झाला आहे.

## साकी.

सुर नर सर्वेहि सीतेवरती सुमनाचे संभार॥
हांकिति वदती सुगति मदही लीलानंत्र अनिवार॥ ७९
असंख्य दुंदुभि धौंधां करणें वाजंत्र्याचा बाजा ॥
वाजे गाजे त्रिभुवनिं कीर्ती धन्य रघूत्तम भाजा॥ ८०

---

१ सीता २ त्रिलोकी. ३ पुष्पवृष्टी. ४ सीता.

[redacted]न म्हणतात) अहो ठीकच आहे हें भावी कृत्य मनांत आणू[redacted] आपलें दिव्य स्वरूप रसेंत गुप्त ठेविलें होतें तेंच आतां दिव्या[redacted]ट केलें, रामाची दिव्य कांता सीता रावणाच्या हातामध्यें गेली ह्या केवळ पोकळ बाता आहेत. असें कोणी ह्याला वेदांतांत पाहील तर त्यास धादांत समजून येईल, कीं, छाया रूपानें सीतेनें ही अप्रतीम माया दाखवून सत्गुण गायास्तव कौतुक मात्र करून दाखविलें हें खरें.

### साकी

सीतास्वरूपा पावक घेउनि दशास्य कानेन जाळी
दिव्य मिषानें स्वरूप घेऊनि आली मैथिल बाळी॥ ८१

सीता:- ( अवर्णनीय अत्यानंदानें )

### साकी.

हंसगतीनें शुद्ध मतीनें सीता रामापाशीं ॥
येतां उठला रघुपति तोषें सुरवर जो गुणराशी॥ ८२

### श्लोक

श्रीरामाननदेखुनी निज सखीं वृद्धिंगता पावली
सीतानें करुनी सुहास्य वदना घाली मिठी पाउलीं॥
देई क्षेम तिला धरोनि हृदयीं कोदंड पाणी स्वयें
वामांका वरि बैसवी नवल हें वर्णावयानें नये॥ ८३

### श्लोक

श्री राम नें दिसतसे नव मेघ रंग॥
विद्युल्लता गमत जानकि ती अभंग॥
झालि सुरासुर अमूप मनांत दंग॥
लीहो अम्हां वदति राम पदाब्ज संग॥ ८४

---

१ अग्नि (हाच जसा सीता रूप घेउनी.) २ रावण हेंच कोणी रान. ३ जनक नंदिनी (सीता)
[redacted]जि. ६ मास होवो.

**शंकर-** हे पुराण पुरुषा, सुखधामा, श्रीरामा

### श्लोक

आनंद कंद रघुनंदन पूर्ण साचा ॥ जो ईश पालक
असे सकलां जिवांचा ॥ मर्दावया असुर घेवि विधाव-
तार ॥ हें त्यांत दीसत चरित्र सुसार[1] सार ॥ ८५ ॥

हे सच्चिदानंद, युगायुगीं त्वां दुष्टअसुरमर्दनार्थ नानाविधावतार धारणकेले परंतु हें चरित्र अगाध झालें, संग्रामें करून मत्कंठगत हलाहल विष सकल शांत झालें, असाजो तूं त्या तुझे दर्शनें करून मला अत्यानंद प्राप्त झाला, असो, आतां सीते सह वर्तमान अयोध्या पुरीं गमन करावें.

**राम-** हे अनादि सिद्धा विश्वंभरा, कैलास नाथा, आपण माझें अराध्य दैवत अहांत आणि ही सर्व करणी आपलीच आहे, ब्रम्हांड दग्ध करण्याची शक्ती ज्या हलाहल विषाच्याठायीं होती तें आपण स्वकंठी धारणकरून लोकरक्षण केलेंत तस्मात् मी कांहीं आपल्या वेगळा नाहीं.

**ब्रम्हदेव-** हे क्षीराब्धिवासी, भव भंजना तुझ्या नाभिकमळा पासून मी उत्पन्न होऊन सृष्टी निर्माण केली त्यांत रावण कुंभकर्णादिक अनेक क्रूरासुर मदोन्मत्त होत्साते अति दुष्ट कर्म करूं लागले तेणकरून धर्म ऱ्हास होऊं लागला त्यासंकटास्तव युगायुगाच्या ठायीं आपण नानाविधावतार घेऊन धर्म संस्थापना केली तोच पुराण पुरुष तूं राम आहेस जनकाचें मीष करून अरण्यवास करून सीता निमित्तें रावणास वधून निजभक्तांचे संरक्षण केलें, तो तूंच हा श्रीराम हें मी समजून आहें.

**राम-** हे लक्षुर पद्म लेखना, ब्रम्हदेवा, तूं कथन करतोस ह्यातील गुप्त रहस्यें तुला व मलाच माहीत आहेत आपण उभयतां अभेद अहोंत.

**इंद्र-** हे ब्रम्हानंदा, परात्परा आम्हां सर्वांस आपण बंध मुक्त केलेंत हा महद उपकार झाला, या दासास कांहींतरी सेवा सांगावी.

**राम-** हे सहस्त्राक्षा, तूं समरांगणी ऐन वेळेवर दिव्य रथ पाठविलास तेणेंक

---

१ उत्तम प्रकारचें सार म्हणजे बळ आहे ज्यांत असें चरित्र.

रून जय प्राप्त झाला हाच तुझा मजवर उपकार आहे.

**इंद्र-** हे अयोध्यानाथा आपल्या प्रसादें करून आम्हांस स्वपदीं स्थिरीं राखा-वें, चकोरांनीं चंद्रास, चातकांनीं मेघास कोण्या गुणें तृप्त करावें? क्षीराब्धीस तक्र समर्पण करणें, किंवा कुबेरास कपर्दिका नजर करणें जसें तसेंच मारुत्य पाठविला म्हणून आपण उपकार मानितां हें मला नवल वाटतें (चरणालिंग-न देतो)

**राम-** कित्येक वेदशास्त्र संपन्न जनांनीं धर्माधर्मांची निवड करून अनेक-सार गोष्टी सिद्ध केल्या. त्यांत मुख्य हें कीं, "परोपकाराय पुण्याय पापाय पर पीडनं" हाच मुख्य श्रुत्यार्थ हेतू होय तर असा हा परमोपकार वानर गणां-स घडला. त्यांनीं मजकरितां समरांगणीं आपले प्राणही वेचिले याहूनअधि-क काय सांगावें, त्यांचीं कुटुंबें आप्तजनादि इष्टमित्र शोकार्णवीं बुडून गेले असतील, यास्तव ते माझे सर्व वानरगण त्यांस पुनः त्यांजीववावें

**इंद्र-** महाराज आपल्या अशिर्वादें करून ही सेवा सिद्धि प्रत पावो, क्षणार्धांत स-र्व वानरें उठवून रामचरण वंदितो

### श्लोक

इंद्राज्ञे करि वृष्टि त्या कपिवरीं पीयूषमेघावली॥ तेणें वानर
मंडळी सकळही जीवंतता पावली॥ कौसल्यात्मज भक्त त
मरण त्यां येणार हो कोठुनी॥ हेतू हा धरुनी मनीं समजुनी
घ्या सार तें साधुनी॥८६॥

**वानरें-** (रामास वंदून अत्यानंदानें) अहाहा हे जगत्स्वित्या, अनाथ ना-था, रुरश्रेष्ठ, त्वच्चरण कृपेनें आम्हीं पुनरपि जीवित्व पावलों असीच या दीन भक्तांवर सदां सार्वकाळ आपली पूर्ण कृपादृष्टी असावी.

**विदुषक-** अरे सूत्रधारा या प्रसंगीं मला एक शंका येते ऐकशील तर जिव्हा आकांस प्रस्थान ठेवण्यास सांगतों.

**सूत्रधार-** बरें आहे पडूं दे तर खरी एकदांची शिंपली बाहेर मोतीं, गळूं द्यात-र खरा तुमचा मुखरस, होऊंच द्यात तुमचा मुखगत घंटानाद.

१ अमृत २ समूह.

**विदुषक**:- अहो या रणभूमीवर युद्धांत कित्येक वानरें आणि रजनीचर पडले होते. असें असून अमृतवृष्टीनें वानरेंच कशीं उठलीं आणि राक्षसांचें काय झालें (सभेकडे पाहून) कांमंडळी या हरिपानें आतां सूत्रधार रावजीना कशी घोटाळ्याची होंटाळी दिली आहे ते समर्पक प्रत्युत्तर देतील तरच ऐकायचें नाहींतर मग ते कसें ऐकायाचें हें उघड होईल.

**सूत्रधार**:- अरे, तुझाहा शेंवटचा वाग्बाण वर्माचे वर्म भेदन करीत आहे अस्तु श्रवण कर, अमृतवृष्टीच्या पूर्वींच श्री शंकराच्या भूलावळीनें राक्षसांचीं प्रेतें मात्र भक्षण केलीं होतीं, कपींचीं कलेवरें तशींच होतीं म्हणून तीं जीविल पावलीं समजलास.

**विदुषक**:- (मान डोलवून) वहावारे चतुरस्र वक्त्या आतां माझी पूर्वोक्त शंका शिलक राहिली नाहीं म्हणून पावती देऊं काय? चालूं दे तर पुढें काय असेल तें.

**राम**:- (सप्रेमानें) हे लंकाधीशा बिभीषणा, आतां आम्हांला आज्ञा द्यावी, आणि त्वां स्वनगरीं गमन करावें, आम्ही अयोध्यापुरीचा मार्ग धरतों.

**बिभीषण**:- (परम गहिंवरून) हे भक्त कामदा, श्रीरामचंद्रा, मला टाकून जातां काय? लंका सदृश अनंत राज्य स्थानें आपल्या सुस्वरूपा वरून ओंवाळून टाकावीं. आपल्या भजनावरून मोक्षादि मुक्तींचें लिंबलोण करावें असा आपला चरण कमल सेवा तत्परतेचा महदानंद त्यागून लंकेचें राज्य करण्यांत कांहीं सुख असेल असें नाहीं मला आपल्या संगें अयोध्येस येऊन तेथें सेवा करून राहण्याची आज्ञा असावी.

**राम**:- (आलिंगून) हे परमभक्ता तुझ्या हृदय कमलीं माझें सदोदित वसतिस्थान आहे, बरें अयोध्येस चल तेथील सुख सोहळा पाहून नंतर लंकेप्रत जा. आतां पुष्पक नामक विमान सत्वर आणावें.

**बिभीषण**:- विमान अणवून) हे दीन पालका, श्रीरामचंद्रा, विमान सिद्ध आहे अहाहा कितीतरी हें उत्कृष्ट आहे.

**श्लोक.**

(शार्दूल विक्रीडित.)

सोभा भेहुनि भासते अधिक ही यानें प्रभा साजिरी ॥ देखा स्कं-
दर शा विराजति बहू मोत्याचिया झल्लरी ॥ रत्नें दिव्य अमो-
ल हीं दिसतिजीं सिंहासना जोडलीं ॥ संकोचें आणि विस्तरें
बहुत तें इच्छा करीतां भली ॥ ८७ ॥

राम- विमानास वंदून सीतेचा कर धरून) अगे आतां आपण ह्या रत्नखचित सोपान मार्गे दिव्य विमानी सिंहासनारूढ होऊन अयोध्येप्रत गमन करूं. (उभयतां विमानारूढ होतात.)

साकी.

लक्ष्मण अंगद व्यजनें वारिति सीता रामावरती ॥ अष्टादश
ने महा क्षौणितें वाजंत्रें वाजती ॥ ८८ ॥

विदुषक- यारे काय थाट !!! छप्पन्न कोटी गोळांगुळ अठरा पद्म वानरें, बहात्तर कोटी रीस या दिव्य व विस्तृत विमानारूढ झालेच आहेत, वाजंत्री झडतच आहेत, सीता व राम हे महदानंदें गुजगोष्टी बोलतच आहेत अष्टवसू काय अष्टकोनी उभे आहेत तेव्हां हें आहे तरी काय ? सांग !!

सूत्रधार- अरे हा मत्यस त्रिजगदाधिपती श्रीराम जानकी सह वर्तमान अशा अनुपमेय थाटानें विजयी होत्साते अयोध्यापुरी गगन मार्गें गमन करीत आहेत त्यांस तूं सोंग कसें म्हणतोस ?

विदुषक- अरे नाटकांत खरोखरच राम येऊं लागला मग काय पाहिजे हें-तर सर्व ढोंग आहे म्हणून त्यास मी सोंग म्हटलें त्यांत तुला इतकें अवघड कां वाटलें !

सूत्रधार- अरे आतां बडबडीची गडबड पुरे कर जे कोणी रामभक्त असतील त्यांस हा लीला प्रकार पाहून ज्याकालीं साक्षात् ह्या गोष्टी झाल्या त्याचें स्मरण होऊन त्यांची भक्तिदार्ढ्यता पावणार नाहीं काय ?

विदुषक- अहाहा, खरेंच असें जर आहे तर कोणतीही अटक मनांत न आणितां बेधडक नाटक पहाण्यास सिद्ध असावें हेंच सत्य.

---

१ चंद्रकांती हून २ विमानाची शोभा. ३ परंतु

सूत्रधार:- पहा या दिव्य विमानावर सुरनर सुमनें सुमनवृष्टी करीत आहेत जिकडे तिकडे आनंद सुखाची लूट होत आहे पुढें भरताची श्रीरामचंद्रास भेट होऊन सर्वांस अत्यानंद झाला आहे.

श्रीरामचंद्रार्पणमस्तु.

ग्रंथाची समाप्ती

आर्या

श्रीसांबपदीं अर्पण करितो हा ग्रंथ बाळकृष्णसुत
रावजि उपाभिधानें लेले ऐसें जनांत वदतात ॥ १ ॥

ओंवी

शके सत्राशें ब्याण्णवांत ॥ प्रमोदाब्धी श्रावणांत
गोकुळाष्टमीस हा समाप्त ॥ झाला ग्रंथ श्रीकृपें ॥ २ ॥

आर्या

वाल्मीकापुरिं असतां नारो आपाजि गोडबोल्यांनीं ॥
रावणवध नाटक हा ग्रंथ कराहें सुचविलें त्यांनीं ३ ॥
द्यावी त्यातें ईशें संतति संपत्ति आणि आरोग्य ॥
या सद्गुणि पुरुषाचें पावो वृद्धिंगत सदा भाग्य ॥ ४ ॥

---

ता० २० आगष्ट १८७८